# मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.

**<u>अपील क्र.१०४२/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री धनराज किसनजी झाडे<br>मु. पो. महदुल्ला (पंचाळा)<br>ता. रामटेक जि. नागपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा. कार्यकारी अभियंता<br>पेंच पाटबंधारे व्यवस्थापन, उपविभाग - कांद्री (जांब)<br>ता. मोहाळी जि. भंडारा. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>पेंच पाटबंधारे व्यवस्थापन, उपविभाग - कांद्री (जांब)<br>ता. मोहाळी जि. भंडारा. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १८/१०/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०२/०७/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२१/०९/२०११ रोजी नोटीस काढून दि.१८/१०/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.०७/०४/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी, पेंचपाटबंधरे व्यवस्थापन उपविभाग कांद्री (जांब) यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन पाटबंधारे व्यवस्थापन शाखा खिंडसी मध्ये कॅनलच्या कामाची संपूर्ण माहिती मागितली होती. त्यामध्ये १) इस्टिमेट कॉपी २) काम करणाऱ्या संस्थेचे नाव व पत्ता, ३) कंत्राटदालाला काम दिलेल्या कामाचा तपशील, ४) काम पूर्ण झाले की

नाही याबाबतची माहिती, ५) झालेल्या कामाची एम. बी. प्रत. आणि सदरच्या माहितीचा कालावधी सन २००५ ते २०११ (माहे मार्च २०११) या कालावधीतील माहिती मागितली आहे. त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी दि.१९/०४/२०११ च्या पत्रान्वये सहाय्यक कार्यकारी अभियंता, पेंचपाटबंधारे व्यवस्थापन उपविभाग कांद्री (जांब) यांनी असे कळविले की, आपण या कार्यालयास मागितलेली माहिती व त्या संबंधिचा खर्च आपल्याला ३ दिवसात कळविण्यात येईल असे त्यांना लेखी कळविले त्यानंतर सहाय्यक कार्यकारी अभियंता, यांनी दि.०७/०५/२०११ च्या पत्रान्वये अपीलार्थीस माहितीचे शुल्क रु.२८७०/- भरणे बाबत लेखी पत्राने कळविले. त्याला अनुसरुन अपीलार्थीने दि.१०/०५/२०११ रोजी माहितीचे शुल्क रु.२८७०/- चा भरणा केला. परंतू त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील सहा. कार्यकारी अभियंता पेंच पाटबंधारे व्यवस्थापन कांद्री (जांब) यांचेकडे ०६/०६/२०११ रोजी दाखल केले. परंतू प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेतली नाही तसेच अपीलकर्ता यांना प्रथम अपीलाचा कोणताही निर्णय प्राप्त झाला नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. तसेच त्यांनी माहितीकरीता केलेल्या शुल्काचा भरणा केल्यामुळे त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त करुन द्यावी अशी अपीलार्थीने आयोगापुढे विनंती केली.

३. जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी, पेंच पाटबंधारे व्यवस्थापन उपविभाग कांद्री (जांब) हे दोनही अधिकारी द्वितीय अपीलाचे सुनावणीस गैरहजर आहेत. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणाी त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. तथापी प्रस्तुत प्रकरणात अपीलार्थीचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलार्थीने जनमाहिती अधिकारी यांचेकडे दि.०७/०५/२०११ च्या पत्रान्वये दि.१०/०५/२०११ रोजी माहितीच्या शुल्काचा भरणा केलेला आहे. आणि सदरच्या माहितीचे शुल्क अपीलार्थीने भरले आहे म्हणून अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील मंजूर करण्यात येत आहे.

**आ दे श**

१. अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांच्या दि.०७/०४/२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन संपूर्ण माहिती अपीलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी. सदरच्या मुदतीत अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन न दिल्यास जनमाहिती अधिकारी यांचेवर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र.............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

## मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.

**अपील क्र.१०६१/नाग/२०११, अपील क्र.१०५९/नाग/२०११**

१. श्री अशोक रायभान चिमनकर - **अपीलकर्ता**
प्लॉट नं. १७६, शिक्षक कॉलनी, भरत नगर, कळमना मार्केट रोड, नागपूर
ता. जि. नागपूर.

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा सह सचिव - **उत्तरवादी**
शालेय शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२.

३. जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी - **उत्तरवादी**
शालेय शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२.

४. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षण संचालक
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, पूणे
ता. जि. पुणे-९.

५. जनमाहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, पूणे
ता. जि. पुणे-९.

**(आदेश पारित दिनांक २०/१०/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी अनुक्रमे दि. ०६/०७/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये वर नमुद केलेली दोन द्वितीय अपीले दाखल केली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२२/०९/२०११ रोजी नोटीस काढून दि.२०/१०/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि. १८/०४/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी शालेय शिक्षण विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन त्यांच्या दि.२१/०२/२०११ च्या आणि दि.२८/०२/२०११ च्या अर्जाप्रमाणे केलेल्या कार्यवाहीची पूर्वलक्षी प्रभावाने थकीत वेतन व नियमित वेतन मिळवून देण्याबाबतची माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडून दि.०४/०६/२०११ च्या पत्रान्वये आणि शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडून दि.१५/०७/२०११ च्या पत्रान्वये माहिती प्राप्त झालेली आहे. मात्र सदरची माहिती समाधानकारक नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले असल्याचे नमुद केले.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी शालेय शिक्षण विभाग मंत्रालय मुंबई यांचे तर्फे श्रीमती बुराडे प्राचार्या, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था नागपूर ह्या हजर आहेत. तसेच शिक्षण संचालक माध्यमिक व उच्च माध्यमिक पुणे यांचे तर्फे जनमाहिती अधिकारी श्री साबळे हजर आहेत. त्याचप्रमाणे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद नागपूर यांचे तर्फे श्री चौधरी उपशिक्षणाधिकारी हजर आहेत.

४. जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांचे वतीने उपस्थित असलेल्या श्रीमती बुराडे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांचा दि.१८/०४/२०११ चा माहितीचा अर्ज मंत्रालयामध्ये दि.११/०५/२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलार्थीने मागितलेली माहिती ही शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद नागपूर यांचेशी संबंधित असल्याने अपीलकर्त्याचा मुळ माहितीचा अर्ज त्यांच्याकडे दि.०४/०६/२०११ रोजी पाठविण्यात आला आणि दि.०४/०६/२०११ च्या पत्रान्वये अपीलार्थीस असे कळविले की, आपण मागितलेली माहिती शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडून प्राप्त करुन घ्यावी. त्याचप्रमाणे माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील जनमाहिती अधिकारी यांनी देखील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद नागपूर आणि विभागीय उपसंचालक नागपूर यांना अपीलकर्त्याच्या माहितीच्या अर्जावर कार्यवाही करण्याबाबत कळविल्याचे श्री साबळे यांनी सांगितले.

५. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद नगापूर यांचे वतीने उपस्थित असलेले उपशिक्षणाधिकारी श्री चौधरी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास दि.१५/०७/२०११ च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली. आणि सदरच्या माहितीमध्ये अपीलकर्त्यास कळविले की, आपण यापूर्वी श्री लक्ष्मीविद्यालय नागपूर येथे काम करीत होते. सदर शाळा बंद झालेली आहे आपण दि.३०/०३/१९९९ नंतर कुठेही कार्यरत नसल्यामुळे पूर्वलक्षीत प्रमाणे थकीत वेतन तसेच नियमीत वेतन मिळवून देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. तसेच श्री लक्ष्मी विद्यालय नागपूर बंद झाल्यामुळे महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी सेवाशर्ती नियमावली २५ (अ) नुसार कार्यवाही करण्यात आली आहे अशी माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन दिल्याचे श्री चौधरी यांनी आयोगापुढे सांगितले की, सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी मान्य केले. मात्र अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की, शिक्षणाधिकारी यांनी त्यांना नोकरीवर सामावून घेण्याची कार्यवाही करावी. तथापी सदरची बाब आयोगाचे कार्यकक्षेत येत नाही त्यासाठी अपीलार्थीने सक्षम अधिकाऱ्याकडे दाद मागणे योग्य होईल. तथापी अपीलार्थीस वर नमुद केल्याप्रमाणे शिक्षणाधिकारी यांनी दि.१५/०७/२०११ च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्त्याचे वरील दोनही अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१. अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १०६१/२०११ आणि १०५९/२०११ खारीज करण्यात येत आहेत.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र.............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.९६६/नाग/२०११**

१. श्री अशोकराव गोविंदरावजी पराते - **अपीलकर्ता**
पंडित नेहरु कॉन्हव्हेंट, तांडापेठ, नागपूर
ता. जि. नागपूर-४४० ०१७.

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार - **उत्तरवादी**
तहसिल कार्यालय मोहाडी
ता. मोहाडी जि. भंडारा.

३. जनमाहिती अधिकारी - **उत्तरवादी**
तहसिल कार्यालय मोहाडी
ता. मोहाडी जि. भंडारा.

**(आदेश पारित दिनांक ०३/१०/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. २३/०६/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०६/०९/२०११ रोजी नोटीस काढून दि.०३/१०/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी यांचे तर्फे श्री रमेश टिकाराम लांजेवर, नायब तहसिलदार हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.०३/१२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी, तहसिल कार्यालय मोहाडी ता. मोहाडी जि. भंडारा यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन प.ह.नं. १४ खाते क्र. १५२, खसरा नं. ४७ च्या संबंधित तहसिलदार मोहाडी यांनी दि.०२/०२/१९८९ रोजी आदेश पारित केलेला आहे त्या आदेशाची प्रमाणित प्रत त्यांनी मागितली होती. परंतू तहसिलदार मोहाडी यांचेकडून दि.२८/१२/२०१०

च्या पत्रान्वये असे कळविण्यात आले की, आपण मागणी केलेल्या प्रकरणातील माहिती पुरविण्याकरिता संबंधित प्रकरणाचा शोध लागताच माहिती पुरविण्यात येईल. मात्र त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलानंतर देखील त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे जनमाहिती अधिकारी यांचे वतीने नायब तहसिलदार श्री लांजेवार हे हजर असून त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.०३/१२/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. परंतू अपीलार्थीने मागितलेल्या माहितीच्या अनुषंगाने सदर प्रकरणाचा शोध घेतला असता सदर प्रकरण मिळाले नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे अपीलकर्त्यास दि.२८/१२/२०१० तसेच दि.३१/०१/२०११ आणि दि. १०/०३/२०११ च्या पत्रान्वये माहिती कळविण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. सदरचे दि.२८/१२/२०१० चे पत्र आणि १०/०३/२०११ चे पत्र अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीचेवेळी मान्य केले. मात्र तहसिलदार मोहाडी यांच्या दि.०२/०२/१९८९ च्या आदेशाची प्रत त्यांना मिळाली नाही असेही त्यांनी सांगितले. याबाबत जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे उपस्थित असलेले नायब तहसिलदार श्री लांजेवार यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की, अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही सुमारे २० वर्षापूर्वीची आहे तसेच अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचा जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात कसून शोध घेण्यात आला परंतू त्यांना अपीलार्थीस पाहिजे असलेली माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून ती माहिती अपीलार्थीस देता आली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

४. याबाबत अपीलार्थीचे प्रामुख्याने असे म्हणणे आहे की, तहसिलदार यांचे कार्यालयात त्यांनी मागणी केलेल्या आदेशाची प्रत असणे आवश्यक आहे त्यासाठी तहसिलदार यांचे कार्यालयात या प्रकरणाची जी कागदपत्रे उपलब्ध आहेत ती कागदपत्रे अपीलार्थीस निरिक्षणासाठी उपलब्ध करुन दिल्यास त्याची ते पाहणी करतील आणि पाहणीनंतर अपीलार्थीस पाहिजे असलेली माहिती उपलब्ध झाल्यास त्याची प्रत अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दस्तऐवजांचे निरिक्षण करण्याकरिता तारीख व वेळ लेखी कळवावी आणि त्या तारखेस अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित राहून आवश्यक त्या दस्तऐवजांचे निरिक्षण करावे आणि निरिक्षणाअंती माहिती उपलब्ध झाल्यास ती विनामुल्य देण्यात यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र.............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.९६७/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री उदयभान दगडुजी मालाधारी<br>प्लॉट. क्र. ४४, रोड क्र.१०, विश्वकर्मा नगर, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर<br>ता. जि. नागपूर-४४० ०२७. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक (क.व.औ.सं.)<br>महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई<br>मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतुक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग, मुंबई<br>सेन्ट्रल मुंबई-०८. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा मुख्य कर्मचारी वर्ग अधिकारी<br>महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई<br>मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतुक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग, मुंबई<br>सेन्ट्रल मुंबई-०८. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०३/१०/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. २३/०६/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०६/०९/२०११ रोजी नोटीस काढून दि.०३/१०/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.२६/०४/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्य कर्मचारी वर्ग अधिकारी, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळ मुंबई यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन श्री हेमंत अविनाश साबळे याची सन २००६ मध्ये सहा वाहतुक अधिक्षक (क) या पदी खेळाडू समांतर आरक्षणामधून निवड झाली आहे. त्यांनी या पदासाठी केलेला अर्ज त्या अर्जासोबत जोडलेल्या सर्व प्रमाणपत्रांच्या प्रती उदा. खेळाडू, जडवाहन चालविण्याचा परवाना, अनुभव, MSCIT इ. च्या झेरॉक्स प्रती त्यांनी मागितल्या होत्या. मात्र त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी दि.०५/०५/२०११ च्या पत्रान्वये कळविले की, आपण मागितलेली माहिती इतर उमेदवारांच्या अभिलेख्यांशी संबंधित असल्याने माहितीचा अधिकार अधिनियमातील खंड ११ नुसार माहिती देण्यावर आबंधन आहे असे कळवून त्यांना माहिती दिली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील महाव्यवस्थापक (क.व.औ.सं.) मुंबई यांचेकडे दाखल केले. परंतू प्रथम अपीलाची सुनावणी ३० दिवसांचे मुदतीत घेऊन निर्णय दिलेला नाही म्हणून त्यांचे विरुध्द कार्यवाही करावी असे अपीलार्थीने आयोगासमोर सांगितले.

३. आज आयोगापुढे जनमाहिती अधिकारी यांचे वतीने श्री अंभोरे विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी नागपूर विभाग हे हजर होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा महा व्यवस्थापक यांचे वतीने विभाग नियंत्रक श्री वाकोडे हजर होते.

जनमाहिती अधिकारी यांचे वतीने उपस्थित असलेले श्री अंभोरे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीच्या दि.२६/०४/२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी दि.०५/०२/२०११ च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास माहितीचा अधिकार अधिनियम कलम ११ अन्वये माहिती देता येत नाही असे कळविले आहे. त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील महाव्यवस्थापक मुंबई यांचेकडे दाखल केले. मात्र कामाच्या व्यस्ततेमुळे प्रथम अपीलाचा निर्णय ३० दिवसात घेता आला नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने उपस्थित असलेले श्री वाकोडे यांनी सांगितले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने दि.२६/०४/२०११ च्या माहिती अर्जान्वये जनमाहिती अधिकारी

यांचेकडे श्री हेमंत अविनाश साबळे यांची सन २०१० मध्ये सहा वाहतुक अधिक्षक (क) या पदावर नेमणूक झाल्या संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. अपीलार्थीने मागितलेली माहिती ही भरती प्रक्रियेशी संबंधित असल्याने सदरची भरती प्रक्रिया ही पारदर्शकतेने झालेली आहे हे सर्व सामान्य व्यक्तींना कळण्यासाठी व्यापक जनहिताच्या दृष्टिकोनातून सदरची माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी नुसार सार्वजनिक प्राधिकरणाचे कामात पारदर्शकता असणे आवश्यक आहे ही बाब लक्षात घेता अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे म्हणून अपीलकर्त्याचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या दि.२६/०४/२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन आवश्यक ती माहिती विनामुल्य रजिस्टर्ड पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२. प्रस्तुत प्रकरणात प्रथम अपील दाखल झाल्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी ३० दिवसांचे मुदतीत प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन निर्णय दिलेला नाही म्हणून त्यांना याबाबत सक्त ताकीद देण्यात येत असून भविष्यात त्यांनी याची पुनरावृत्ती करु नये अशी समजही त्यांना देण्यात येत आहे.

३. सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ मुंबई मध्यवर्ती कार्यालय महाराष्ट्र वाहतुक भवन डॉ. आनंदराव नायर मार्ग मुंबई सेन्ट्रल मुंबई नं.८ यांचेकडे कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.

४. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र.............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

# मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.

**<u>अपील क्र.९६५/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री देवीदास शंकरराव चौरे<br>मु. सायवाडा पो. थडीपवनी<br>ता. नरखेड जि. नागपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक<br>सहकारी संस्था नरखेड<br>ता. नरखेड जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा अध्यक्ष/सचिव<br>सेवा सहकारी संस्था मर्या. सायवाडा/अंबाडा<br>ता. नरखेड जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०३/१०/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. १७/०६/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०६/०९/२०११ रोजी नोटीस काढून दि.०३/१०/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.०७/०१/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, सेवा सहकारी संस्था मर्या. सायवाडा, अंबाडा ता. नरखेड जि. नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन सेवा सहकारी संस्थेला स्वस्त धान्य दुकान आहे ते दुकान संस्था चालविते किंवा किरायाणे

दिलेले आहे याबाबतची माहिती त्यांनी मागितली होती. परंतू त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील सहाय्यक निबंधक सहकारी संस्था नरखेड यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत प्रथम अपीलाचा निर्णय देवूनही जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना उपलब्ध करुन दिली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी तथा सचिव श्री फुसे हे हजर होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा. निबंधक नरखेड श्री प्रकाश भजनी हे हजर होते.

जनमाहिती अधिकारी श्री फुसे यांनी आयोगापुढे सांगितले की, सहकारी संस्थेला माहितीचा अधिकार हा कायदा लागू नाही म्हणून अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली नाही. त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील सहाय्यक निबंधक नरखेड यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलामध्ये माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत निर्णय देण्यात आला असे सहाय्यक निबंधक श्री भजनी यांनी आयोगापुढे सांगितले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रस्तुत प्रकरणी म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, सेवा सहकारी संस्था सायवाडा ही संस्था सहकारी कायदाखाली नोंदणीकृत झालेली आहे. मात्र सदर संस्थेला वैद्यनाथन अहवालानुसार शासनाकडून अनुदान प्राप्त झाल्याचे सहाय्यक निबंधक यांनी सांगितले. म्हणून सदर संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी लागू होतात म्हणून अपीलकर्त्यास विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ३ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी तथा सचिव यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या दि.०७/०१/२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन आवश्यक ती माहिती विनामुल्य रजिस्टर्ड पोस्टाने किंवा व्यक्तीशः उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र.............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.९६९/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री वासुदेव शिवराम बगमारे<br>रा. बोंडेगाव, पो. कुर्झा<br>ता. ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी<br>नगर परिषद ब्रम्हपुरी<br>ता. ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>नियोजन विभाग, नगर परिषद ब्रम्हपुरी<br>ता. ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०३/१०/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. १७/०६/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०६/०९/२०११ रोजी नोटीस काढून दि.०३/१०/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.११/०४/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी नगर परिषद ब्रम्हपुरी यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन गैर अर्जदार श्री मधुकर श्रावण करंबे रा.

बोंडेगाव यांचे अनधिकृत बांधकामाबाबत दि.११/०१/२०११ आणि दि.०७/०२/२०११ रोजी तक्रार अर्ज दिला होता. त्या तक्रार अर्जाप्रमाणे मौका स्थळ पाहणी अहवालाची व चौकशी अहवालाची प्रत त्यांनी मागितली होती. परंतू त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दि.१८/०४/२०११ च्या पत्रान्वये मौका स्थळ अहवालाचा रेकॉर्ड त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नाही असे कळविण्यात आले. त्यामुळे त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी दि.२९/०४/२०११ रोजी मुख्याधिकारी, नगर परिषद ब्रम्हपुरी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सादर केलेल्या निवेदनाची छाननी केली असता असे दिसून येते की, अपीलकर्त्याच्या दि.११/४/२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी दि.१८/०४/२०११ च्या पत्राने अपीलार्थीस आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीचेवेळी मान्य केले. मात्र अपीलकर्ता यांचे प्रस्तुत प्रकरणात असे म्हणणे आहे की, नगर परिषदेने गैरअर्जदाराचे अनधिकृत बांधकाम तोडण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे. तथापी माहितीच्या अधिकारात कार्यवाही करुन मिळत नाही. फक्त माहिती उपलब्ध करुन देण्याची तरतुद आहे. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि.१८/०४/२०११ च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र.............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.९७८/नाग/२०११**

१. श्री उज्वलकुमार वा. बागडे - **अपीलकर्ता**
रा. सावनेर वार्ड क्र.१७,
ता. सावनेर जि. नागपूर.

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी - **उत्तरवादी**
नगर परिषद सावनेर
ता. सावनेर जि. नागपूर.

३. जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता - **उत्तरवादी**
बांधकाम विभाग, नगर परिषद सावनेर
ता. सावनेर जि. नागपूर.

**(आदेश पारित दिनांक ०४/१०/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. २०/०६/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०६/०९/२०११ रोजी नोटीस काढून दि.०४/१०/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.२४/०३/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, बांधकाम विभाग नगर परिषद सावनेर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन सावनेर नगर परिषद येथील मुळ दलीतवस्ती वार्डासह इतर दलितवस्ती वार्डातील एरियाची माहिती तसेच दलितांची संख्या, दलित वस्तीपॅकेज येत असलेल्या एरियाँ वार्ड क्र.११ बाबत माहिती मागितली होती. त्यांना

जनमाहिती अधिकारी यांनी दि.०६/०४/२०११ च्या पत्रान्वये दलितवस्तीचा अंर्तभाव असलेल्या पॉकेट नकाशामध्ये जी दलितवस्ती आहे त्या संदर्भात पॉकेट नकाशाची फी रु.२००/- चा भरणा करण्याबाबत कळविले. परंतू त्यांना आकडे वारीच्या स्वरुपात माहिती पाहिजे आहे. नकाशाची त्यांनी मागणी केलेली नाही म्हणून त्यांनी नकाशाची फी भरणा केली नाही. त्यानंतर त्यांनी प्रथम अपील मुख्याधिकारी यांचेकडे दाखल केले. तथापी प्रथम अपीलाच्या निर्णयात देखील त्यांना नकाशाची फी भरण्याबाबत कळविण्यात आले म्हणून अपीलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरिता जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, यांचे तर्फे श्री शेंबेकर तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी यांचे तर्फे श्री बावनगडे हे हजर होते. त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीच्या दि.२४/०३/२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन अपीलार्थीस दलितवस्ती पॉकेट नकाशात असल्यामुळे पॉकेट नकाशा करिता रु.२००/- च्या शुल्काचा भरणा करुन माहिती प्राप्त करुन घेण्याचे कळविले. परंतू अपीलार्थीने पॉकेट नकाशाचे शुल्क भरले नाही म्हणून अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी देखील अपीलकर्त्याच्या पॉकेट नकाशाचे शुल्क भरुन माहिती घेऊन जाणे बाबतचा निर्णय दिलेला आहे असेही त्यांनी आयोगापुढे सांगितले.

४. मात्र प्रस्तुत प्रकरणात अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, त्यांना नकाशाची आवश्यकता नाही त्यांना फक्त आकडेवरीच्या स्वरुपात माहिती पाहिजे आहे. म्हणून आयोगासमोर जनमाहिती अधिकारी यांचे वतीने उपस्थित असलेले श्री शेंबेकर यांनी पॉकेट नकाशाची प्रत आयोगासमोर दाखविली त्या नकाशामध्ये दलितवस्ती एरियाँ सदर्भात विवरण पत्र जोडले आहे. त्या विवरण पत्राची प्रत अपीलार्थीस उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. तसेच त्या विवरण पत्रात कसाईपूरा आणि मांगपूरा हे एरियाँ दलित वस्तीत मोडत असल्यास त्या भागाची माहिती अपीलकर्त्यास पाहिजे आहे म्हणून ती देखील अपीलार्थीस उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून प्रस्तुत प्रकरणात आयोगासमोर झालेल्या चर्चेनुसार जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दलितवस्ती संदर्भातील पॉकेट नकाशामध्ये दर्शविलेल्या विवरणपत्राची माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून सात दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास पॉकेट नकाशा सोबत दलितवस्ती संदर्भात जोडलेल्या विवरण पत्राची प्रत तसेच कसाईपूरा व मांगपूरा या एरियाँ मध्ये दलितवस्ती मोडत असलेल्या भागांची माहिती अपीलार्थीस विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र.............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.९७९/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री उज्वलकुमार वा. बागडे<br>रा. सावनेर वार्ड क्र.१७,<br>ता. सावनेर जि. नागपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी<br>नागपूर विभाग नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी<br>नागपूर<br>प्रशासकीय इमारत क्र.१, सिव्हील लाईन्स, नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०४/१०/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. २०/०६/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०६/०९/२०११ रोजी नोटीस काढून दि.०४/१०/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि. ०७/०३/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन दलितवस्ती वार्डाला विकासापासून व मुलभूत सुविधांपासून वंचित ठेवण्यात येत असल्याबाबत त्यांनी दि.२४/१२/२०१० ला

तक्रार अर्ज दिला होता. त्या तक्रार अर्जावर काय कार्यवाही करण्यात आली याबाबतची माहिती त्यांनी मागितली होती. परंतू त्यांना कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील विभागीय समाजकल्याण अधिकारी यांचेकडे दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी नागपूर श्री सिध्दार्थ गायकवाड हे हजर होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी यांचे तर्फे जनसंपर्क अधिकारी श्री भूषण चांदिले हे हजर होते.

जनमाहिती अधिकारी श्री सिध्दार्थ गायकवाड यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांचा दि.०७/०३/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलार्थीने मागितलेली माहिती ही मुख्याधिकारी नगर परिषद सावनेर यांचेशी संबंधित असल्याने सदरच्या माहितीचा अर्ज त्यांच्याकडे दि.२८/०३/२०११ ला पाठविण्यात आला. तसेच अपीलार्थीचा तक्रार अर्ज देखील त्यांच्याकडे पाठविण्याबाबत मुख्याधिकारी यांना कळविले. तथापी मुख्याधिकारी यांचेकडून अपीलकर्ता यांचा तक्रार अर्जाचा अहवाल प्राप्त झाला नाही म्हणून त्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन देता आली नाही. त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील विभागीय समाज कल्याण अधिकारी यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी झाली आणि प्रथम अपीलाच्या निर्णयात असे नमुद करण्यात आले की, अपीलकर्त्यने मांडलेली तक्रार ही निवेदन स्वरुपाची आहे म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी मुख्याधिकारी सावनेर नगर परिषद यांना विशेष बाब म्हणून दलितवस्तीसाठी विकास कामे करण्याबाबत विनंतीपत्र देवून पाठपुरावा करावा असा प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आल्याचे श्री गायकवाड यांनी आयोगापुढे सांगितले. प्रथम अपीलाच्या निर्णयाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी दि.०४/०६/२०११ च्या पत्रान्वये पुन्हा मुख्याधिकारी नगर परिषद सावनेर यांना पत्र पाठवून अपीलकर्त्याच्या तक्रारी संदर्भात स्वयं स्पष्ट अहवाल सादर करणे बाबत कळविले. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि.१४/०६/२०११ च्या पत्रान्वये अशी माहिती उपलब्ध करुन दिली की, आपल्या तक्रारीच्या संदर्भात मुख्याधिकारी नगर परिषद सावनेर यांचेकडून अहवाल मागविण्यात आला आहे तो अहवाल अदयाप अप्राप्त आहे त्यांच्याकडून अहवाल प्राप्त होताच तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती आपणास

उपलब्ध करुन देण्यात येईल असे अपीलार्थीस कळविल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. सदरची माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे अपीलार्थीने आयोगापुढे मान्य केले. मात्र त्यांच्या तक्रार अर्जावर चौकशी होवून काय कार्यवाही झाली याबाबतची माहिती त्यांना मिळणे आवश्यक आहे असे त्यांचे म्हणणे आहे. म्हणून प्रस्तुत प्रकरणी जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीच्या दि.२४/१२/२०१० च्या तक्रार अर्जावर मुख्याधिकारी नगरपरिषद सावनेर यांचेकडून अहवाल प्राप्त करण्याबाबत पाठपुरावा करुन तो अहवाल प्राप्त करुन घेऊन त्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी अपीलार्थीच्या दि.२४/१२/२०१० च्या तक्रार अर्जाच्या संदर्भातील अहवाल मुख्याधिकारी, नगर परिषद सावनेर यांचेकडून प्राप्त करुन घेण्यासाठी योग्य तो पाठपुरावा करावा आणि सदर अहवाल त्यांच्याकडे प्राप्त झाल्यावर त्या अहवालावर केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्त्यास ३० दिवसात विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र.............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.९७१/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | डॉ. रामदास (बच्चु) मोतीरामजी भुते<br>बी-II-४०६, हनि अर्चना कॉम्प, उंटखाना, मेडिकल मार्ग, नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक<br>सहकारी संस्था नागपूर<br>धनवटे चेम्बर्स, सिताबर्डी, नागपूर-१२. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा उपनिबंधक<br>सहकारी संस्था शहर-१, नागपूर<br>१८५, आयुर्वेदिक ले-आऊट, भांडे प्लॉट चौक, उमरेड रोड, नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०४/१०/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. १४/०६/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०६/०९/२०११ रोजी नोटीस काढून दि.०४/१०/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि. ११/०४/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था नागपूर शहर-१ यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन सिंधी हिंदी हायर सेकेण्डरी सोसा. रजि २७२ मध्ये गैरव्यवहार झालेला आहे त्या संदर्भात रकमा वसूलीची कार्यवाही आणि

केलेल्या पोलीस कार्यवाही बाबत त्यांनी माहिती मागितली होती. तथापी त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी द्वितीय अपील दाखल केल्याचे सांगितले.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी तथा उननिबंधक यांचे तर्फे श्री कोकुलवार हे हजर होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय सह निबंधक नागपूर यांचे वतीने श्री संजय कदम विभागीय उपनिबंधक हे हजर होते.

जनमाहिती अधिकारी यांचे वतीने उपस्थित असलेले श्री कोकुलवार यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांचा दि.११/०४/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.१३/०४/२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलार्थीने सिंधी हिंदी कर्मचारी सहकारी पतसंस्थेबाबत माहिती मागितली होती. त्याला अनुसरुन अपीलार्थीस दि.२६/०४/२०११ च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिली. आणि सदरच्या माहितीमध्ये असे नमुद केले की, सदर संस्थेमध्ये झालेल्या गैरव्यवहारा संदर्भात संस्थेची कमेटी बरखास्त केली असून संस्थेवर प्रशासकाची नेमणूक करण्यात आलेली आहे. तसेच गैरव्यवहारा संदर्भात सहकारी कायदा कलम ८८ अन्वये चौकशी सुरु असून सदर संस्थेचे चाचणी लेखा परिक्षण करण्याबाबत देखील आदेश निर्गमित करण्यात आले आहेत असे देखील अपीलार्थीस दि.२६/०४/२०११ च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिल्याचे श्री कोकुलवार यांनी सांगितले. त्यानंतर अपीलार्थीने विभागीय सहनिबंधक यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि.२६/०४/२०११ च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.०१/०६/२०११ रोजी प्रथम अपील फेटाळल्याचे श्री संजय कदम यांनी सांगितले.

जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असेही सांगितले की, प्रस्तुत संस्थेची सहकारी कायदा कलम ८८ च्या चौकशीची कार्यवाही अदयाप पूर्ण झालेली नाही. तसेच सदर संस्थेचे चाचणी लेखापरिक्षण देखील झालेले नाही म्हणून सदर संस्थेची कलम ८८ प्रमाणे चौकशी पूर्ण झाल्यानंतर आणि संस्थेचे चाचणी लेखापरिक्षण झाल्यानंतर त्याबाबत पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल तथापी सद्यस्थितीत त्यांचे कार्यालयामार्फत कोणतीही पोलीस कार्यवाही करण्यात आलेली नाही असे त्यांनी आयोगापुढे स्पष्ट केले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रस्तुत प्रकरणी म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी त्यंच्या माहिती अर्जाला अनुसरुन दि.२६/०४/२०११ च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी सद्यःस्थितीत त्यांच्या कार्यालयाकडून कोणतीही पोलीस कार्यवाही संस्थेविरुध्द केलेली नाही असे स्पष्टपणे अपीलार्थीस कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस असे कळवावे की, सद्यःस्थितीत संस्थेविरुध्द त्यांच्या कार्यालयाकडून कोणतीही पोलीस कार्यवाही करण्यात आलेली नाही. जनमाहिती अधिकारी यांनी वरीलप्रमाणे माहिती अपीलकर्त्यास विनामुल्य किंवा व्यक्तीशः रजिस्टर्ड पोस्टाने माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र.............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

# मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.

**अपील क्र.८६७/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. मनोहर तुकारामजी रेवाळे<br>C/o, ६५, रामबाग, नागपूर<br>ता. जि. नागपूर-४४० ००३ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा कुलसचिव<br>महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, म्हसरुळ, दिंडोरी रोड, नाशिक<br>ता. जि. नाशिक-४२२ ००४. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा उपकुलसचिव<br>महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, म्हसरुळ, दिंडोरी रोड, नाशिक<br>ता. जि. नाशिक-४२२ ००४. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०४/१०/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०५/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१८/०८/२०११ रोजी नोटीस काढून दि.२१/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. परंतु सदरतारखेस सुनावणी होवू शकली नाही म्हणून दि.०४/१०/२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि. १९/०९/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपकुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन शासकीय व खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये MBBS अभ्यासक्रमाकरिता विमुक्त जातीच्या (व्हि.जे.)

शैक्षणिक सत्र १९९९-२००० (फ्री सिटवर) प्रवेश दिल्याबाबतची माहिती मागितली होती. त्यामध्ये १) व्हि.जे. विद्यार्थ्यांचे पूर्ण नाव २) SML नंबर, ३) स्टेट व्हि. जे. मेरिट नं. ४) सीईटी मध्ये मिळालेले मार्कस् आणि फ्री सिटवर वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश दिलेल्या महाविद्यालयाचे नाव अशी ५ मुद्यांवर माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती मिळाली. परंतू सदरची माहिती अपूर्ण असल्यामुळे त्यांनी प्रथम अपील कुलसचिव यांचेकडे दाखल केले. परंतू त्यांचे प्रथम अपील फेटाळण्यात आल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे जनमाहिती अधिकारी तथा उपकुलसचिव डॉ. आहेर हे उपस्थित होते तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा कुलसचिव यांचे वतीने देखील त्यांनाच प्राधिकृत करण्यात आले होते.

जनमाहिती अधिकारी डॉ. अहेर यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांचा दि.१९/०९/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.११/१०/२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने सन १९९९-२००० या शैक्षणिक सत्राविषयीची माहिती मागितली होती. त्याला अनुसरुन त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती काढण्यात आली. आणि अपीलकर्त्यास दि.२०/१०/२०१० रोजी माहितीचे शुल्क भरण्याकरिता पत्र पाठविण्यात आले. अपीलकर्त्याने मनिऑर्डरद्वारा दि.०९/११/२०१० रोजी माहितीचे शुल्क पाठविले. आणि त्यानंतर त्याचदिवशी दि.०९/११/२०१० च्या पत्रान्वये अपीलार्थीस त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती पाठविण्यात आली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र सीईटी मध्ये मिळालेल्या मार्क्सची माहिती त्यांना उपलब्ध झालेली नाही असे त्यांनी सांगितले. त्याबाबत जनमाहिती अधिकारी डॉ. अहेर यांनी आयोगापुढे सांगितले की, सन १९९९-२००० या कालावधीत विद्यापीठामार्फत सीईटी परिक्षा घेण्यात आली होती. सदरची परिक्षा सुमारे ११ वर्षापूर्वी घेण्यात आली असलयामुळे त्या परिक्षेची माहिती त्यांच्या कार्यालयाकडे आजरोजी उपलब्ध नाही. तसेच त्यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की, आरोग्य विद्यापीठाने सीईटी च्या परिक्षेची माहिती जतन करण्याचा कालावधी हा ५ वर्षाचा निश्चित केला आहे.

त्याबाबतच्या  नियमांची प्रत त्यांनी आयोगासमोर सादर केली. त्यामुळे अपीलार्थीने मागितलेल्या सीईटी परिक्षेची माहिती ही सुमारे ११ वर्षापूर्वीची असल्याने ती माहिती विद्यापीठाकडे आता उपलब्ध नाही असे डॉ. अहेर यांनी सांगितले. तसेच अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी दि.०९/११/२०१० च्या पत्रान्वये जी माहिती उपलब्ध करुन दिली आहे त्यामध्ये सीईटी परिक्षेबाबतची माहिती त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नाही असे स्पष्टपणे कळविले आहे. तथापी इतर मुद्यांची माहिती अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी  यांना निर्णयाची  प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र.............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ  नागपूर  यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.९८६/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री जिवन एकनाथ दुधकोहर<br>द्वारा-मधुकर टेकाम यांचे घरी, डॉ. ताटेवार दवाखान्याजवळ, दे.गो.तुकुम, चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक<br>सिरोंचा वनविभाग, सिरोंचा<br>ता. सिरोंचा जि. गडचिरोली. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>उपवनसंरक्षक सिरोंचा वनविभाग, सिरोंचा<br>ता. सिरोंचा जि. गडचिरोली. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०५/१०/२०११)**
**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. १६/०६/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०८/०९/२०११ रोजी नोटीस काढून दि.०५/१०/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.०८/०२/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी उपवनसंरक्षक सिरोंचा वनविभाग गडचिरोली जिल्हा यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन सन १९८५ ते १९९० या कालावधीत वनरक्षक या पदावर सरळसेवेने आणि अनुकंपा तत्वावर झालेल्या नेमणुकी संदर्भात माहिती मागितली होती. तसेच श्री एकनाथ गोविंदा नेवारे वनरक्षक यांची नियुक्ती अनुकंपा तत्वावर झाली

किंवा सरळ सेवेद्वारे करण्यात आली. याबाबत त्यांनी माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडून आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडून सदर माहिती ही २० वर्ष जुनी असल्यामुळे माहितीचा शोध घेऊनही उपलब्ध होवू शकली नाही असे कळविले म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय वन अधिकारी श्री निकत हे हजर होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक सिरोंचा यांचे तर्फे श्री जिद्देवार हे हजर होते.

जनमाहिती अधिकारी श्री निकत यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांचा दि.०८/०२/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.१५/०२/२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयातील आस्थापना शाखेशी संबंधित असल्याने दि.१८/०२/२०११ च्या पत्रान्वये आस्थापना शाखेकडून माहिती मागविली. परंतू आस्थापना शाखेने असे कळविले की, अपीलार्थीने मागितलेली माहिती ही सुमारे २५ वर्षापूर्वीची असल्यामुळे फार जुनी व विस्तृत असल्यामुळे सदरची माहिती शोधण्याचे काम सुरु आहे ती माहिती मिळाल्यानंतर ती आपणास २ ते ३ महिन्याच्या कालावधीत पुरविण्यात येईल. त्यानंतर अपीलकर्ता यांनी प्रथम अपील उपवनसंरक्षक सिरोंचा यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी देखील अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचा शोध घेण्यासाठी आस्थापना शाखेच्या कक्ष प्रमुखास दि.१६/०३/२०११ च्या पत्रान्वये माहितीचा शोध घेऊन ती माहिती तात्काळ तयार करण्याच्या सुचना दिल्या. त्यानुसार आस्थापना प्रमुखांनी आस्थापना शाखेतील सदर माहितीचा शोध घेतला. परंतू सदर माहिती ही जुनी असल्यामुळे ती आस्थापना प्रमुखास उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी उपवनसंरक्षक यांचेकडे दि.१०/०९/२०११ च्या पत्रान्वये सदर माहिती ही शोध घेऊनही उपलब्ध झाली नसल्याचे कळविले. त्यानंतर अपीलार्थीस दि.१९/०९/२०११ च्या पत्रान्वये असे कळविण्यात आले की, आपण मागणी केलेल्या दस्तऐवजांचा शोध घेतला असता त्यांना अपेक्षित माहिती आढळून आली नाही त्यामुळे आपण मागणी केलेले दस्तऐवज पुरविता येत नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने हजर असलेले जिद्येवार यांनी सांगितले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतले असता असे प्रस्तुत प्रकरणी दिसून येते की, अपीलकर्त्याने मागितलेल्या माहिती अर्जातील माहिती ही २० वर्षापूर्वीची आहे. तसेच अपीलार्थीने आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की, त्यांना मुख्यत्वे करुन श्री एकनाथ गोविंदा नेवरे वनरक्षक यांची नेमणूक अनुकंपा तत्वावर किंवा सरळ सेवेने झाले आहे याबाबतची माहिती त्यांना पाहिजे आहे. म्हणून श्री नेवारे हे ज्या कार्यालयामध्ये सद्यःस्थितीत कार्यरत आहेत त्या कार्यालयातील त्यांच्या सेवापुस्तकाच्या नोंदीवरुन अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन देणे शक्य आहे. तसेच श्री एकनाथ गोविंदा नेवारे हे वनरक्षक पदावर असतांना या पदाची जी सेवा जेष्ठता यादी आहे त्याची प्रतही अपीलार्थीस उपलब्ध करुन दिल्यास त्यासेवा जेष्ठता यादीवरुन अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध होईल म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी श्री एकनाथ गोविंदा नेवारे त्यांच्या नेमणुकीच्या संदर्भात त्यांच्या आदेशाची प्रत किंवा त्यांच्या सेवा पुस्तिकेच्या नोंदीची झेरॉक्स प्रत संबंधित कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन अपीलार्थीस विनामुल्य रजिस्टर्ड पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी. त्याचप्रमाणे अपीलकर्त्यास श्री एकनाथ गोविंदा नेवारे वनरक्षक या पदा बाबतची सेवा जेष्ठता यादी संबंधित कार्यालयाकडून जनमाहिती अधिकारी यांनी प्राप्त करुन ती देखील अपीलकर्त्यास व्यक्तीशः किंवा रजिस्टर्ड पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

P.T.O

२.    अपीलकर्ता व उत्तरवादी  यांना निर्णयाची  प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र.............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ  नागपूर  यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.९८८/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री दिलीप गजाननराव खेडीकर<br>नयापुरा राममंदीर जवळ, प्रेमनगर वार्ड क्र.३४, नागपूर<br>ता. जि. नागपूर-२. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा बाजार अधिक्षक (बाजार विभाग)<br>महानगर पालिका, नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक अधिक्षक (बाजार विभाग)<br>महानगर पालिका, नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०५/१०/२०११)**
**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. २०/०६/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०८/०९/२०११ रोजी नोटीस काढून दि.०५/१०/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा बाजार अधिक्षक (बाजार विभाग) मनपा श्री फागो उईके हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.१३/०४/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहा. अधिक्षक, बाजार विभाग नागपूर महानगर पालिका यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन सौ अल्काताई दलाल यांनी बाजार समितीचे अध्यक्ष पद स्विकारल्यापासून ३१ मार्च २०११ पर्यंत त्यांच्या संदर्भात

महानगर पालिकेने वाहनांवर व इतर बाबींवर केलेल्या खर्चाची व दस्तऐवजांची ABCDEFGHIJK अशा ११ मुद्यांच्या स्वरुपात माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून मुद्येनिहाय माहिती प्राप्त झाली नाही फक्त काही माहितीच त्रोटक स्वरुपात प्राप्त झाली म्हणून त्यांनी दि.०३/०६/२०११ रोजी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलानंतरदेखील त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे जनमाहिती अधिकारी तथा सहा. अधिक्षक हे शालेय पट पडताळणी कार्यक्रमात व्यस्त असल्याने अनुपस्थित राहिले. तथापी त्यांचे वतीने प्रथम अपीलीय अधिकारी तथा बाजार अधिक्षक श्री फा. गो. उईके उपस्थित होते. त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.१३/०४/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.१५/०४/२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलार्थीने मागितलेली माहिती महानगर पालिकेच्या मा. निगम सचिव तसेच सहाय्यक अधिक्षक, सा.प्र.वी. यांचेशी संबंधित होता. म्हणून अपीलार्थीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे पाठविण्यात आला. आणि अपीलकर्त्यास परस्पर माहिती उपलब्ध करुन देण्याचे त्यांना कळविले आणि त्या पत्राची प्रत अपीलार्थीस पाठवून सदरची माहिती मनपा समिती विभाग व सा. प्र. वि. यांचेकडून प्राप्त करुन घ्यावी असे कळविले. त्यानंतर सामान्य प्रशासन विभाग आणि समिती विभाग यांनी एकूण ८ पृष्ठांची माहिती उपलब्ध करुन दिली. ती माहिती जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि.१४/०६/२०११ च्या पत्रान्वये पाठविली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र त्यांना सदरच्या माहितीमध्ये मुद्येनिहाय माहिती नेमकी कोणती आहे याचा कोणताही उलगडा होत नसल्याचे त्यांनी आयोगापुढे सांगितले. म्हणून आयोगासमोर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी मुद्येनिहाय माहिती दिलेली नाही. याबाबत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी देखील आयोगापुढे हे मान्य केले की, अपीलार्थीस मुद्येनिहाय माहिती दिलेली नाही. म्हणून प्रस्तुत प्रकरणात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगासमोर असे सांगितले की, येत्या १५ दिवसात अपीलकर्त्यास पुन्हा मुद्येनिहाय माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात येईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांच्या दि.१३/०४/२०११ च्या माहिती अर्जातील मुद्येनिहाय माहिती विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर्ड पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र.............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

# मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.

**अपील क्र.९८७/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री मधुकर रामाजी नंदुरकर, अव्वल कारकुन<br>तहसिल कार्यालय गडचिरोली<br>ता. जि. गडचिरोली. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप आयुक्त (महसूल)<br>आयुक्त कार्यालय, नागपूर विभाग, नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार (महसूल)<br>आयुक्त कार्यालय, नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०५/१०/२०११)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. १८/०६/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०८/०९/२०११ रोजी नोटीस काढून दि.०५/१०/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. आज आयोगापुढे अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. मात्र आज सुनावणीचेवेळी जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार (महसूल) आयुक्त कार्यालय नागपूर श्री सी. पी. शिरसाम हे उपस्थित होते. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने त्यांनाच प्राधिकृत करण्यात आले होते. श्री शिरसाम यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांचा दि.१९/१/२०११ चा माहितीचा अर्ज

त्यांच्या कार्यालयाकडे दि.२१/०१/२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलार्थीने सदरच्या माहिती अर्जात सन २००९ ची आयुक्त कार्यालय नागपूर येथील DPC मिटींगची प्रत आणि शासनास मंजुरीस पाठविल्याची प्रत अशी माहिती मागितली होती. अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास दि.१४/०२/२०११ रोजी माहितीचे शुल्क रु ६००/- भरण्याबाबत कळविले. अपीलार्थीने दि.२३/०२/२०११ रोजी माहितीचे शुल्क भरले. त्या नंतर अपीलकर्त्यास दि.०५/०३/२०११ च्या पत्रान्वये नोंदणीकृत डाकेने आवश्यक ती माहिती पाठविली आणि सदरची माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याबाबतची पोच त्यांनी आयोगापुढे दाखविली. त्यानंतर अपीलार्थीने उपायुक्त यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.१५/०४/२०११ रोजी देण्यात आला. त्या निर्णयाप्रमाणे अपीलार्थीस देण्यात आलेली माहिती तपासून पुन्हा काही माहिती द्यावयाची असल्यास ती उपलब्ध करुन द्यावी असे नमुद करुन प्रथम अपीलाचा निर्णय कळविण्यात आला. त्याला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि.२७/०४/२०११ च्या पत्रान्वये माहिती तपासण्यासाठी कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविले होते परंतू अपीलकर्ता माहिती तपासण्यासाठी कार्यालयात हजर झाले नाही.

३. प्रस्तुत प्रकरणी जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि.०५/०३/२०११ च्या पत्रान्वये नोंदणीकृत डाकेने आवश्यक ती माहिती उपलब्ध दिल्यामुळे अपीलार्थीचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र.............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

# मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.

**अपील क्र.९९६/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री कृष्णा हेमराज कनोजिया<br>४८६, बुध्द नगर, आनंद बुध्द विहाराजवळ, पो. आंबेडकर मार्ग, नागपूर<br>ता. जि. नागपूर-४४००१७. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी<br>जिल्हा परिषद चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>जिल्हा परिषद चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १०/१०/२०११)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. २३/०६/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०९/०९/२०११ रोजी नोटीस काढून दि.१०/१०/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. आज आयोगापुढे अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. मात्र आज सुनावणीचेवेळी जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक (पंचायत विभाग) जिल्हा परिषद

चंद्रपूर श्री राजेश माथनकर हे हजर होते. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांचे वतीने त्यांनाच प्राधिकृत करण्यात आले होते.

जनमाहिती अधिकारी श्री राजेश माथनकर यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांचा दि.११/०४/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.२५/०४/२०११ रोजी प्राप्त झाला होता. सदरच्या माहिती अर्जात अपीलार्थीने ग्रामपंचायत अंभोरा पंचायत समिती चंद्रपूर येथील माजी सचिव श्री दिलीप बापुराव बेलनवर व कनिष्ठ अभियांता येनोरकर यांचेविरुध्द केलेल्या तक्रारीच्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितली होती. त्या संदर्भात या तक्रार अर्जाची चौकशी करण्यासाठी गटविकास अधिकारी, पंचायत समिती चंद्रपूर यांना दि.१९/१०/२०१० तसेच दि.११/०२/२०११ आणि दि.२६/०४/२०११ रोजी सदरच्या तक्रार अर्जावर चौकशी करुन अहवाल मागविण्यात आला. म्हणून त्यांनी अपीलार्थीस गटविकास अधिकारी यांचेकडे पाठविलेल्या या पत्रांच्या प्रती उपलब्ध करुन देण्यासाठी अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दि.०९/०५/२०११ रोजी माहितीचे शुल्क व टपालाचा खर्च भरणेबाबत कळविले. सदरचे पत्र पोस्टाद्वारे पाठविण्यात आल्याचे त्यांनी आयोगापुढे सांगितले. मात्र अपीलार्थीने माहितीचे शुल्क भरणा न करता प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. म्हणून उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या सुचनेनुसार पुन्हा अपीलकर्त्यास दि.०२/०६/२०११ रोजी माहितीचे शुल्क भरण्याबाबत लेखी पत्राद्वारे कळविले. प्रथम अपीलानंतर अपीलकर्त्याने दि.१३/०६/२०११ रोजी माहितीच्या शुल्काचा भरणा केला आणि अपीलार्थीस दि.१३/०६/२०११ च्या पत्रान्वये त्यांच्या तक्रारी संदर्भात चौकशी अहवाल गटविकास यांचेकडून मागितलेला असल्यामुळे त्या पत्राच्या तीनही प्रती अपीलार्थीस उपलब्ध करुन दिल्या. सदर माहिती अपीलार्थीस पंजीबध्द डाकेने पाठविल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कागदोपत्री पुरावे सादर केले. अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र.............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

# मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.

**अपील क्र.९९८/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री ओमप्रकाश किसन तिरपुडे<br>इंदिरानगर, पंचशिल चौक, विश्वशांती बुध्द विहाराजवळ, चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप वनसंरक्षक<br>चंद्रपूर वनविभाग, चंद्रपूर<br>रामबाग नर्सरी, ता. जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक (सं.अ.)<br>उप वनसंरक्षक चंद्रपूर वनविभाग, चंद्रपूर<br>रामबाग नर्सरी, ता. जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १०/१०/२०११)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. २४/०६/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०९/०९/२०११ रोजी नोटीस काढून दि.१०/१०/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.११/०१/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक (सं.अं.) उप वनसंरक्षक चंद्रपूर वनविभाग चंद्रपूर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन सन १९९२ ते २००० पर्यंत वन मजुर म्हणून काम केल्याबाबत मस्टर झेरॉक्सची प्रत मागितली होती.

तसेच वन मजुरांच्या सेवा जेष्ठता यादी याबाबत ३ मुद्यांवर माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून मस्टर उपलब्ध नसल्याचे कळविण्यात आले. अपीलकर्ता यांना वनमजुरांची सेवा जेष्ठता यादी उपलब्ध झाली परंतू त्यामध्ये त्यांचे नाव नाही म्हणून त्यांनी उपवनसंरक्षक यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे जनमाहिती अधिकारी श्री एन. टी. कुरसंगे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप वनसंरक्षक चंद्रपूर वनविभाग चंद्रपूर श्री पी. कल्याणकुमार हे उपस्थित होते.

जनमाहिती अधिकारी श्री एन. टी. कुरसंगे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.११/०१/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.१२/०१/२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलार्थीने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात माहिती वन परिक्षेत्र अधिकारी चंद्रपूर यांचेशी संबंधित असल्यामुळे सदर माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.१६/०१/२०११ रोजी पाठवून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्याचे कळविले. आणि त्याची प्रत अपीलकर्त्यास पाठवून आपण मागितलेली माहिती वन परिक्षेत्र अधिकारी चंद्रपूर यांचेशी संबंधित असल्याने आपण त्यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी असे अपीलार्थीस कळविले असल्याचे जनमहिती अधिकारी यांनी सांगितले. सदरचे पत्र अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. परंतू वन परिक्षेत्र अधिकारी चंद्रपूर यांनी त्यांच्याकडील दि.१०/०२/२०११ च्या पत्रान्वये मुद्या क्र.१ आणि ३ ची माहिती उपलब्ध नाही असे कळविले. आणि मुद्या क्र.२ ची माहिती जनमाहिती अधिकारी यांनी पाठविली. त्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि.१४/०३/२०११ च्या पत्रान्वये मुद्या क्र.१ ची माहिती उपलब्ध नाही असे कळविले आणि मुद्या क्र. २ व ३ ची माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन दिली. अपीलकर्त्यास सदर माहिती प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना वनमजुरांची सेवा जेष्ठता यादी प्राप्त झाली आहे. परंतू त्या सेवाजेष्ठता यादीत त्यांचे नाव नाही. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले की, वन मजुरांच्या सेवा जेष्ठता यादी संदर्भात जे मजुर सेवा जेष्ठतेचे निकष पूर्ण करतात त्यांचे नाव सेवा जेष्ठता यादीत समाविष्ट होते.

तथापी अपीलकर्ता हे सेवा जेष्ठतेचे निकष पूर्ण करीत नसल्यामुळे त्यांचे नाव वनमजुरांच्या सेवा जेष्ठता यादीत समाविष्ट नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. अपीलार्थीचे नाव सेवाजेष्ठता यादीत समाविष्ट नसल्याचे दिसून येते तथापी अपीलार्थीस वर नमुद केल्याप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र.............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.९९५/नाग/२०११**

१. श्री योगेश मुर्लीधर जगताप - **अपीलकर्ता**
सम्राट अशोक चौक, चोरखिडकी वार्ड, चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर.

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी (नियोजन) - **उत्तरवादी**
चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर.

३. जनमाहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक - **उत्तरवादी**
चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर.

**(आदेश पारित दिनांक १०/१०/२०११)**
**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. २४/०६/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०९/०९/२०११ रोजी नोटीस काढून दि.१०/१०/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.०१/०३/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी, तथा कार्यालय अधिक्षक चंद्रपूर वनवृत्त चंद्रपूर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना घरबांधणी अग्रीमाचे वाटपाबाबत योजना लागू झाली. तेव्हापासून ते सन २०१०

पर्यंतची माहिती एका विशिष्ट नमुन्यात मागितली होती. अपीलकर्ता यांना सदर माहिती विहीत नमुन्यात पाहिजे होती परंतू त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून विहित नमुन्यात माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी दि.२५/०४/२०११ रोजी प्रथम अपील दाखल केले. दि.२५/०७/२०११ रोजी प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला. परंतू प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर देखील त्यांना विहीत नमुन्यात माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक श्री कराडे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी श्री दोडल हे उपस्थित होते.

जनमाहिती अधिकारी श्री कराडे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीस तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी दि.१५/०४/२०११ च्या पत्रान्वये त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती दिली होती. सदरची माहिती संकलीत करण्यास बराच कालावधी लागला आहे. आणि त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील दाखल केले. परंतू अपीलकर्त्याच्या मागणीनुसार व अपीलकर्त्याने तयार करुन दिलेल्या नमुन्यानुसार पुन्हा सदरची माहिती तयार करण्यात आली. आणि ती माहिती अपीलकर्त्यास दि.०३/१०/२०११ च्या पत्रान्वये पाठविण्यात आली. मात्र सदरची माहिती अपीलार्थीस पोस्टाने अद्यापपर्यंत प्राप्त झाली नसलयाचे त्यांनी आयोगापुढे सांगितले. म्हणून अपीलार्थीस पुन्हा आयोगासमोर दि.३/१०/२०११ च्या पत्राची माहिती जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली आणि अपीलार्थीने ती आयोगासमोर स्विकृत केली. आणि त्यांनी मागितलेल्या नमुन्यात त्यांना माहिती प्राप्त झाली म्हणून त्यांनी समाधान व्यक्त केले. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

P.T.O.

## **आ दे श**

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र.............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

# मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.

**अपील क्र.९९७/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सौ. वत्सला वासुदेव पाल<br>मु. नाका नं. ७, आंबेडकर नगर, कन्हान पो. कन्हान<br>ता. पारशिवनी जि. नागपूर-४४१ ४०१. | - | **अपीलकर्ती** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी<br>पंचायत समिती पारशिवनी<br>ता. पारशिवनी जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा सचिव<br>गट ग्राम पंचायत खंडाळा (घ.)<br>ता. पारशिवनी जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १०/१०/२०११)**

**निर्णय**

१. अपीलकर्ती यांनी दि. २७/०६/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०९/०९/२०११ रोजी नोटीस काढून दि.१०/१०/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ती व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.२१/०२/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, गट ग्रामपंचायत खंडाळा ता. पारशिवनी यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन कै. पांडुरंग डोमा पाटील यांचे नावे असलेली गहुहिवरा येथिल मालमत्ता क्रमांक ६० व ६१ ही त्यांच्या नावे झाली तेव्हापासून ते

आजतागायत संपूर्ण कागदपत्रे त्यांनी मागितली होती. त्यांना कोणतीही माहिती विहीत मुदतीत मिळाली नाही म्हणून त्यांनी खंडविकास अधिकारी पारशिवनी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी तथा सचिव, गट ग्रामपंचायत खंडाळा (घ) ता. पारशिवनी श्री यू. डी. चांदुरकर हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंडविकास अधिकारी, पंचायत समिती पारशिवनी श्री पाटील हे उपस्थित होते.

जनमाहिती अधिकारी श्री चांदुरकर यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्तीचा दि.२१/०२/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.२२/०२/२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्तीस माहितीचे शुल्क रु.५०/- भरण्याबाबत कळविले सदरचे पत्र अपीलकर्तीच्या पतीने पाहिले मात्र सदरचे पत्र त्यांनी घेण्यास नकार दिला. त्यानंतर अपीलकर्तीने प्रथम अपील खंडविकास अधिकारी यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली आणि प्रथम अपीलाचा निर्णय दि.१७/०६/२०११ रोजी देण्यात आला. त्यामध्ये अपीलार्थीस विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले. त्याला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस पोस्टाने माहिती पाठविली. तथापी सदरची माहिती अपीलकर्तीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्यामुळे स्विकारली नाही असे अपीलकर्तीने आयोगापुढे सांगितले. तथापी अपीलार्थीस संबंधित कागदपत्रांच्या प्रती उपलब्ध करुन देण्यासाठी त्याच्या संपूर्ण कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती त्यांनी काढल्या आणि सदरची कागदपत्रे त्यांनी आयोगापुढे अपीलार्थीस विनामुल्य उपलब्ध करुन दिली. सदरची कागदपत्रे अपीलार्थीने आयोगासमोर स्विकृत केली म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलार्थीचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र.............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.१००५/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | कु. स्मिता निळकंठ चांदेकर<br>एफ-२, तारा अपार्टमेंट, सिव्हील लाईन्स् चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर - ४४२ ४०१. | - | **अपीलकर्ती** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक<br>सामान्य रुग्णालय, चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा निवासी वैद्यकीय अधिकारी<br>सामान्य रुग्णालय, चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ११/१०/२०११)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. १९/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०९/०९/२०११ रोजी नोटीस काढून दि.११/१०/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ती व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.१२/११/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा निवासी वैद्यकीय अधिकारी, सामान्य रुग्णालय चंद्रपूर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन सौ. डॉर्थी नि. चांदेकर, सेवानिवृत्त परिसेविका यांचे वेतना संदर्भात माहे एप्रिल १९९९ ते माहे मार्च २००० या

कालावधीत LIC Policy No. ९७१९९१७२८८ चे प्रति माह ३९/- प्रमाणे पगारातुन कपात करण्यात आली किंवा कसे ? वरील रक्कम कपात झाली असल्यास LIC Policy ला पाठविलेल्या चेकचा क्रमांक आणि कपात झाली नसल्यास कपात न करण्यात आल्याचा कालावधी इ. बाबत त्यांनी माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून ३० दिवसाचे आत कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील जिल्हा शल्य चिकित्सक सामान्य रुग्णालय चंद्रपूर यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलाचा निर्णय त्यांना मिळाला नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सांगितले. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जावर ३० दिवसांचे मुदतीत कोणतीही कार्यवाही केलेली नाही म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी त्यांनी आयोगापुढे केली.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी तथा निवासी वैद्यकीय अधिकारी यांचे तर्फे प्रशासकीय अधिकारी श्री एम. व्ही. तवले हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रमोद सोनुने हे उपस्थित होते.

जनमाहिती अधिकारी तथा निवासी वैद्यकीय अधिकारी यांचे तर्फे उपस्थित असलेले श्री एम. व्ही. तवले यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्तीचा दि.१२/११/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्तीने मागितलेली माहिती फार जुनी असून अंदाजे ११ वर्षापूर्वीची आहे. तसेच त्यांचे कार्यालय नवीन इमारती मध्ये हलविण्यात आले त्यामुळे रेकॉर्ड कुठे ठेवला होता याबाबत माहिती नव्हती म्हणून त्यावेळी जनमाहिती अधिकारी म्हणून कार्यरत असलेले डॉ. धोटे हे अपीलकर्त्यास ३० दिवसात कोणतीही माहिती उपलब्ध करुन देवू शकले नाही. त्यानंतर अपीलकर्तीने जिल्हा शल्यचिकित्सक चंद्रपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी देखील जनमाहिती अधिकारी म्हणून कार्यरत असलेले डॉ. धोटे यांचेकडेच जिल्हा शल्यचिकित्सक या पदाचा पदभार होता म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी प्रभारी असल्याने अपीलार्थीने लेखी आक्षेप घेतला म्हणून प्रथम अपीलाची सुनावणी झाली नाही असे डॉ. सोनुने यांनी सांगितले. अपीलार्थीने मागितलेला जुना रेकॉर्ड शोधण्याचे प्रयत्न अपीलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यापासून सुरु केला होता असेही जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. त्यानुसार अपीलार्थीला पाहिजे असलेली काही माहिती उपलब्ध झाली आणि सदरची

माहिती अपीलार्थीस दि.०३/१०/२०११ च्या पत्रान्वये आणि दि.०७/१०/२०११ च्या पत्रान्वये विनामुल्य उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्तीस प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र सदर माहिती ही विलंबाने उपलब्ध झाली असून अदयाप त्यांना एप्रिल १९९९, मे १९९९, जुन १९९९, जुलै १९९९, ऑगस्ट १९९९ आणि ऑक्टोबर १९९९ या सहा महिन्यांच्या वेतन पटाच्या प्रती उपलब्ध झाल्या नाहीत असे त्यांचे म्हणणे आहे. त्याबाबत जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, या ६ महिन्याच्या वेतन पटाच्या प्रती शोधण्याचे काम त्यांच्या कार्यालयात सुरु आहे. सदरची माहिती जुनी असल्यामुळे पुन्हा त्यांना ३० दिवसांचे मुदतीत ही माहिती शोधुन अपीलार्थीस देण्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले म्हणून अपीलकर्ती यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ती यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस एप्रिल १९९९, मे १९९९, जुन १९९९, जुलै १९९९, ऑगस्ट १९९९ आणि ऑक्टोबर १९९९ या सहा महिन्यांच्या वेतन पटाच्या प्रती विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर्ड पोस्टाने उपलब्ध करुन द्याव्या. तथापी सदरची माहिती उपलब्ध न झाल्यास त्याबाबतची जबाबदारी संबंधित कर्मचाऱ्यावर निश्चित करुन त्यांच्या विरुध्द योग्य ती कार्यवाही प्रस्तावीत करावी आणि केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगाकडे सादर करावा.

२. जनमाहिती अधिकारी तथा निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. धोटे यांनी अपीलकर्तीस त्यांच्या दि.१२/११/२०१० च्या माहिती अर्जाला अनुसरुन ३० दिवसांचे मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही किंवा माहितीच्या संदर्भात कोणतीही वस्तुस्थिती कळविलेली नाही म्हणून अपीलकर्तीस माहिती उपलब्ध होण्यास विलंब झालेला दिसून येतो आणि या विलंबास डॉ. धोटे हे जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (२) अन्वये शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस का करु नये याचा लेखी खुलासा त्यांना हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत आयोगाकडे सादर करावा.

३. सदरच्या निर्णयाची एक प्रत प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक चंद्रपूर यांनी डॉ. धोटे यांचेकडे खुलासा करण्यासाठी पाठवावी.

४. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र.............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.१००९/नाग/२०११**

१. श्री संजय शंकर कन्नावार - **अपीलकर्ता**
C/o, दत्तुजी नागपूरे, चौव्हाण फॅक्टरी, जलनगर वार्ड, चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर.

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप वनसंरक्षक - **उत्तरवादी**
ब्रम्हपुरी वनविभाग, ब्रम्हपुरी
ता. ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर.

३. जनमाहिती अधिकारी तथा सहा. वनसंरक्षक (स.अ.) - **उत्तरवादी**
ब्रम्हपुरी वनविभाग, ब्रम्हपुरी
ता. ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर.

**(आदेश पारित दिनांक ११/१०/२०११)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. २४/०६/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०९/०९/२०११ रोजी नोटीस काढून दि.११/१०/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.२३/०३/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उप वनसंरक्षक, ब्रम्हपुरी यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन श्री लसमय्या राजम नागुल्ला यांचेबाबत

त्यांची पहिली नियुक्ती तसेच त्यांचे जात प्रमाणपत्र इ. संदर्भात १ ते ४ मुद्यांवर माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दि.१३/०४/२०११ च्या पत्रान्वये मुद्या क्र. ३ ची माहिती प्राप्त झाली मात्र मुद्या क्र. १, २ आणि ४ ची माहिती त्यांना प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलानंतरही त्यांना माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे जनमाहिती अधिकारी तथा सहा. वनसंरक्षक, ब्रम्हपुरी श्री शिंगाडे हे हजर होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप वनसंरक्षक श्री ठवरे हे हजर होते. त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि.२३/०३/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.२९/०३/२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने श्री लसमय्या राजम नागुल्ला वनपाल यांचेबाबत माहिती मागितली होती. तथापी श्री लसमय्या राजम नागुल्ला वनपाल यांची त्यांच्या कार्यालयातून बदली झाली असून ते वनसंरक्षक व वन संवर्धन तज्ञ संशोधन वृत्त पूर्व प्रदेश चंद्रपूर येथे बदली झाली असल्याने त्यांचे सेवा पुस्तक त्या कार्यालयात आहे. त्यामुळे अपीलकर्त्यास मुद्या क्र. १,२ आणि ४ ची माहिती त्यांना देता आली नाही. तथापी मुद्या क्र.३ ची माहिती म्हणजे श्री नागुल्ला यांच्या जात वैधता प्रमाणपत्राची प्रत त्यांना उपलब्ध करुन दिली आणि मुद्या क्र.१, २ आणि ४ ची माहिती संबंधित कार्यालयाकडून घेण्याचे त्यांना कळविले. सदरचे दि.१३/०४/२०११ चे पत्र अपीलकर्त्यास प्राप्त झाले असून मुद्या क्र.३ ची माहिती देखील त्यांना प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने आयोगापुढे मान्य केले. तथापी श्री नागुल्ला यांची सद्यस्थितीत त्यांच्या कार्यालयातून बदली झाली असल्यामुळे ज्या कार्यालयात ते कार्यरत आहेत त्या कार्यालयाकडून अपीलार्थीने माहिती प्राप्त करुन घेणे योग्य राहील तसेच त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली मुद्या क्र. ३ ची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र.............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.१००८/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री सुखचरण भैय्यालाल धिचरिया<br>रेस्ट हाऊस जवळ (पूर्व दिशा) मु. पो. काटोल<br>ता. काटोल जि. नागपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी<br>जि. प. लघुसिंचाई उपविभाग - नरखेड<br>ता. नरखेड जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>जि. प. लघु सिंचाई उपविभाग-नरखेड<br>ता. नरखेड जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ११/१०/२०११)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. २८/०६/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०९/०९/२०११ रोजी नोटीस काढून दि.११/१०/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी यांचे वतीने सहाय्यक जनमाहिती अधिकारी श्री कांबडी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.२८/०३/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी, जिल्हा परिषद लघुसिंचाई उपविभाग नरखेड यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन ते सेवेत कार्यरत असतांना त्यांची मार्च २००३ ते ऑक्टोबर २००३ या कालावधीची वार्षीक वेतनवाढ व थकबाकी काढण्यात आली नाही त्या संदर्भात माहिती मागितली होती. परंतू त्यांना अदयापपर्यंत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी

दि.२०/०५/२०११ रोजी उपविभागीय अधिकारी जि. प. लघुसिंचाई उपविभाग नरखेड यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलानंतरही त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, श्री धुडके यांचे वतीने कनिष्ठ सहाय्यक श्री कैलास कांबडी हे हजर होते. त्यांनी आयोगापुढे सांगितले की, जनमाहिती अधिकारी दवाखान्यात भरती असल्यामुळे ते सुनावणीकरीता उपस्थित राहू शकले नाही. तथापी त्यांचे वतीने श्री कांबडी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता हे त्यांच्या कार्यालयात कार्यरत असतांना सेवानिवृत्त झाले आहेत. परंतू त्यांचे सेवापुस्तक लघुसिंचन विभाग जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे आहे. त्यांच्याकडून सदरच्या सेवापुस्तकाची प्रत प्राप्त करुन अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन पुरविण्यात येईल असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. त्यावर अपीलार्थीने आयोगापुढे असे सांगितले की, त्यांचे सेवापुस्तक प्राप्त झाल्यानंतर त्यांना माहिती उपलब्ध करुन दिल्यास त्यांची हरकत नाही म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१. अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी वर नमुद केल्याप्रमाणे अपीलकर्त्यास त्यांच्या दि.२८/०३/२०११ च्या माहिती अर्जातील माहिती विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर्ड पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र.............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.१०१७/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री राहुल पुंडलिकराव जानवे<br>यात्रा वार्ड, वरोरा<br>ता. वरोरा जि. चंद्रपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी<br>वरोरा<br>ता. वरोरा जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार<br>तहसिल कार्यालय वरोरा<br>ता. वरोरा जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १२/१०/२०११)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. २३/०६/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०९/०९/२०११ रोजी नोटीस काढून दि.१२/१०/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.०३/०३/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार तहसिल कार्यालय वरोरा यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन मौजा वरोरा येथील ओवरब्रिजचे समोरील व मागचे तसेच चौफुली रस्त्याच्या खोदकामाचे, मातीचे (गौणखनिजाचे) तसेच कोर्टाचे

बांधकामाचे मातीचे (गौणखनिजाचे) परवान्याची माहिती मिळणे बाबत माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर वरुन माहिती मागितली होती. तथापी त्यांना ३० दिवसांचे मुदतीत जनमाहिही अधिकारी यांचेकडून कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील उपविभागीय अधिकारी वरोरा यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलानंतरही त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार वरोरा श्री रविन्द्र माने हे हजर होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी वरोरा श्री भुगावकर हे हजर होते.

जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार श्री रविन्द्र माने यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि.०३/०३/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. परंतु कार्यबाहुल्यामुळे ३० दिवसांचे मुदतीत अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर अपीलार्थीने मागितलेली माहिती तयार करण्यात आली आणि अपीलकर्त्यास दि.३०/०९/२०११ च्या पत्रान्वये पोस्टाद्वारे विनामुल्य माहिती पाठविण्यात आली. दि.३०/०९/२०११ च्या पत्रान्वये पाठविलेली माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीचेवेळी मान्य केले. मात्र सदरची माहिती विलंबाने प्राप्त झाल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांचेविरुध्द शास्तीची कार्यवाही करावी असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रस्तुत प्रकरणी म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्त्याच्या दि.०३/०३/२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार वरोरा यांनी अपीलार्थीस ३० दिवसांचे मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. त्यानंतर दि.३०/०९/२०११ च्या पत्रान्वये अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे म्हणून सदरची माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिल्यामुळे जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार यांना खुलासा विचारला असता त्यांनी सांगितले की, कार्यबाहुल्यामुळे ३० दिवसांचे मुदतीत अपीलार्थीस ते माहिती देवू शकले नाही. परंतू सदरचा खुलासा हा मान्य करण्यासारखा नाही म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्याच्या दि.०३/०३/२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार वरोरा यांनी अपीलकर्त्यास ३० दिवसांचे मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून वर नमुद केल्याप्रमाणे अपीलार्थीस माहिती उपलब्ध होण्यास विलंब झालेला दिसून येतो. सदरच्या विलंबाबद्यल जनमाहिती अधिकारी यांनी केलेला खुलासा हा मान्य करण्यासारखा नाही. म्हणून जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार वरोरा यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये रु.५०००/- (रु. पाच हजार) ची शास्ती लादण्यात येत आहे.

३. सदरच्या शास्तीची वसूली उपविभागीय अधिकारी, तहसिल कार्यालय वरोरा यांनी जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार वरोरा यांचे दरमहाचे वेतनातुन कपात करुन ती लेखाशिर्ष "००७० - इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) " मध्ये शासकीय खजिन्यात जमा करावी.

४. उपविभागीय अधिकारी वरोरा यांनी शास्तीची संपूर्ण रक्कम वसूल झाल्यानंतर चालानसह वसुलीचा अहवाल आयोगाकडे सादर करावा.

५. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र.............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.१०१८/नाग/२०११</u>**

१. श्री पँथर प्रकाश बन्सोड - **अपीलकर्ता**
१८०, उंटखाना, मेडीकल कॉलेज रोड, नागपूर
ता. जि. नागपूर.-४४०००९.

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी - **उत्तरवादी**
व्यवस्थापकीय संचालक यांचे कार्यालय, अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ,
२२-बी, कल्याणी केंद्र, म्हाडा वसाहत, अशोक वन, हनुमानटेकडी,
बोरीवली (पूर्व) मुंबई - ४०० ०६६.

३. जनमाहिती अधिकारी - **उत्तरवादी**
व्यवस्थापकीय संचालक यांचे कार्यालय, अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ,
२२-बी, कल्याणी केंद्र, म्हाडा वसाहत, अशोक वन, हनुमानटेकडी,
बोरीवली (पूर्व) मुंबई - ४०० ०६६.

**(आदेश पारित दिनांक १२/१०/२०११)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. २७/०६/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०९/०९/२०११ रोजी नोटीस काढून दि.१२/१०/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि. १६/०३/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मुंबई यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन आपल्या

महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या गाऱ्हाणी/तक्रारी विषयक तक्रार निवारण समिती विषयी १ ते १२ मुद्यांवर माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून ३० दिवसांचे मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दि.२५/०४/२०११ रोजी उपमहाव्यवस्थापक यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन निर्णय देण्यात आला नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सांगितले.

३. जनमाहिती अधिकारी श्री बावणे हजर होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री रामटेके हे आज सुनावणीकरीता हजर आहेत. श्री बावणे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.१६/०३/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.१९/०३/२०११ रोजी प्राप्त झाला होता. सदरच्या माहिती संदर्भात आवश्यक ते उत्तर देण्याबाबत त्यांनी सहाय्यक व्यवस्थापक श्री नारोळे यांना दि.२२/०३/२०११ च्या टिपणीवर उत्तर देण्याबाबत कळविले होते. परंतु त्यावर श्री नारोळे यांनी ३० दिवसांचे मुदतीत कोणतेही उत्तर दिले नाही असे बावणे यांनी सांगितले. अपीलार्थीने माहिती अधिकारात मागितलेल्या माहितीच्या संदर्भात अशी समिती महामंडळात गठीत झाली नाही. तसेच प्रस्तुत प्रकरणी अपीलकर्त्याने प्रथम अपील उपमहाव्यवस्थापक यांचेकडे दाखल केले होते. परंतू प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन निर्णय दिलेला नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने हजर असलेले श्री रामटेके यांनी सांगितले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याचा दि.१६/०३/२०११ चा माहितीचा अर्ज जनमाहिती अधिकारी यांचेकडे दि.१९/०३/२०११ रोजी प्राप्त झाला होता. सदरच्या माहिती अर्जावर ३० दिवसात उत्तर पाठविणे आवश्यक होते. मात्र सदरची माहिती ही महामंडळातील सहाय्यक व्यवस्थापक श्री नारोळे यांनी तयार करुन उपलब्ध करुन द्यावी असे श्री बावणे यांनी श्री नारोळे यांना लेखी सुचना दिल्या होत्या. परंतू श्री नारोळे यांनी अपीलकर्त्यास कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम (५) अन्वये श्री नारोळे यांना जनमाहिती अधिकारी म्हणून समजण्यात येत आहे. म्हणून अपीलकर्त्यास ३० दिवसांचे मुदतीत माहिती उपलब्ध करुन न देण्याच्या विलंबास श्री नारोळे हे जबाबदार दिसून येतात.

म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (२) अन्वये शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस का करण्यात येवू नये याबाबत त्यांचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे. तसेच अपीलार्थीच्या दि.१६/०३/२०११ च्या माहिती अर्जाच्या संदर्भात आवश्यक ती माहिती किंवा त्यबाबतचे उत्तर अपीलार्थीस पाठविणे आवश्यक आहे म्हणून अपीलकर्त्याचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीच्या दि.१६/०३/२०११ च्या माहिती अर्जातील माहिती किंवा त्याबाबतची वस्तुस्थिती अपीलार्थीस विनामुल्य रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावी.

२. प्रस्तुत प्रकरणात सहाय्यक व्यवस्थापक श्री नारोळे यांनी वर नमुद केल्याप्रमाणे अपीलकर्त्याच्या दि. १६/०३/२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यास झालेल्या विलंबाबद्यल श्री नारोळे हे जबाबदार दिसून येतात म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (२) अन्वये शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस का करु नये याचा लेखी खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत आयोगाकडे सादर करावा.

३. प्रस्तुत प्रकरणात प्रथम अपीलीय अधिकारी श्री एस. एस. इंगळे उपमहाव्यवस्थापक यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन निर्णय दिलेला नाही म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) नुसार त्यांच्याकडे सोपविलेली जबाबदारी त्यांनी पार पाडली नाही म्हणून त्यांना याबाबत सक्त ताकीद देण्यात येत असून भविष्यात त्यांनी याबाबींची पूनरावृत्ती करु नये अशी समज त्यांना देण्यात येत आहे.

४. सदरच्या निर्णयाची एक प्रत जनमाहिती अधिकारी श्री बावणे यांनी श्री नारोळे सहाय्यक व्यवस्थापक यांचेकडे खुलासा करण्यासाठी पाठवावी.

५. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र.............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.१०३२/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री नानाजी जैदास रामटेके<br>रा. जानवा पो. इटखेडा<br>ता. अर्जुनी/मोर. जि. गोंदिया. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी<br>पंचायति समिती कार्यालय अर्जुनी/मोर.<br>ता. अर्जुनी/मोर. जि. गोंदिया. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>पंचायति समिती कार्यालय अर्जुनी/मोर.<br>ता. अर्जुनी/मोर. जि. गोंदिया. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १७/१०/२०११)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. २८/०६/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२१/०९/२०११ रोजी नोटीस काढून दि.१७/१०/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि. १४/०४/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी, पंचायत समिती कार्यालय अर्जुनी/मोर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन ग्रामपंचायत कार्यालय जानवा येथील दलितवस्ती एस. सी. लाभार्थींना २००५ साल पासून रुपचंद चाकोराव कांबळे यांनी प्रतिक्षा

यादी फाडल्यामुळे एस. सी. लाभार्थींना घरकुल मिळत नसून त्यांच्यावर पोलीस कार्यवाही केली असून त्यांना वंचित करायला पाहिजे. त्यापासून एस. सी. लाभार्थींना घर मिळत नाही म्हणून त्यांनी दि.२१/०२/२०११ ला अर्ज दिला होता. त्याबाबतची माहिती त्यांनी मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दि. १३/०४/२०११ पत्रान्वये माहिती प्राप्त झाली. परंतू त्या माहितीमध्ये ग्रामसभा ठराव दि.१६/०३/२००५ तसेच रुपचंद कांबळे चे बयान, तहसिलदार यांना सादर केलेले पत्र इ. माहिती उपलब्ध झाली. परंतू त्यांच्या दि. २१/०२/२०११ च्या पत्रावर काय कार्यवाही केली याबाबतची माहिती मिळाली नाही म्हणून प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलानंतर देखील त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, पंचायत समिती अर्जुनी/मोर श्री कापगते हे हजर होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंडविकास अधिकारी श्री मडावी हजर होते.

जनमाहिती अधिकारी श्री कापगते यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.१४/०३/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.१५/०३/२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलार्थीने मागितलेली माहिती ही पंचायत समिती अंतर्गत बांधकाम विभाग (सां. बा.) यांचेशी संबंधित असल्याने दि.१६/०३/२०११ च्या पत्रान्वये त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास कळविले. त्यानुसार त्यांच्याकडून माहिती प्राप्त झाल्यावर अपीलार्थीस दि.१३/०४/२०११ च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र प्रस्तुत प्रकरणी त्यांचे दि.२१/०२/२०११ च्या पत्रावर काय कार्यवाही करण्यात आली याबाबतची माहिती त्यांना मिळाली नाही असे त्यांनी सांगितले. याबाबत जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंडविकास अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की, अपीलार्थीच्या दि.२१/०२/२०११ च्या अर्जाच्या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद गोंदिया यांचेकडे अहवाल पाठविलेला आहे. त्यांच्याकडून याबाबत त्यांना काहीही कळविण्यात आले नाही. म्हणून प्रसतुत प्रकरणात मुख्य कार्यकरी अधिकारी यांचेकडे अपीलार्थीच्या दि.२१/०२/२०११ च्या पत्राच्या संदर्भात पाठविलेल्या अहवालाची प्रत अपीलार्थीस उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# <u>आ दे श</u>

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्याकडील दि.२१/०२/२०११ च्या पत्रावर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद गोंदिया यांचेकडे पाठविलेल्या अहवालाची प्रत विनामुल्य रजिस्टर्ड पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र.............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.१०३१/नाग/२०११**

१. श्री नानाजी जैदास रामटेके - **अपीलकर्ता**
रा. जानवा पो. इटखेडा
ता. अर्जुनी/मोर. जि. गोंदिया.

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी - **उत्तरवादी**
पंचायति समिती कार्यालय अर्जुनी/मोर.
ता. अर्जुनी/मोर. जि. गोंदिया.

३. जनमाहिती अधिकारी - **उत्तरवादी**
पंचायति समिती कार्यालय अर्जुनी/मोर.
ता. अर्जुनी/मोर. जि. गोंदिया.

**(आदेश पारित दिनांक १७/१०/२०११)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. २५/०६/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२१/०९/२०११ रोजी नोटीस काढून दि.१७/१०/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि. ०७/०३/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती अर्जुनी मोर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन पंचायत समिती अर्जुनी /मोर येथील अंदाजे सन २००८-२००९ या वर्षात पंचायत समिती समोर रोडला लागून व्यापारी संकुलाचे

किंवा इतर कोणतेही खोदकाम करण्यात आले असल्यास व ते काम बंद करण्यात आले असल्यास त्या विषयी माहिती मागितली होती. परंतु त्यांना ३० दिवसात माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र त्यानंतर त्यांना दि.१५/१०/२०११ रोजी माहिती प्राप्त झाली मात्र सदरची माहिती विलंबाने प्राप्त झाल्यामुळे संबंधित अधिकाऱ्यावर कार्यवाही करावी असे त्यंनी सांगितले.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी श्री पी. एम. कापगते हे हजर होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंडविकास अधिकारी अर्जुनी /मोर श्री मडावी हे हजर होते.

जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी श्री पी. एम. कापगते यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांचा दि.०७/०३/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलार्थीने मागितलेली माहिती ही पंचायत समिती अंतर्गत बांधकाम विभागाशी संबंधित असल्यामुळे त्यांनी दि.०८/०३/२०११ रोजी कनिष्ठ अभियंता पंचायत समिती अर्जुनी/मोर यांचेकडे अपीलकर्ता यांचा माहितीचा अर्ज पाठवून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत कळविले मात्र त्यांनी ३० दिवसात माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून त्यांनी पुन्हा श्री ए. एम. वैद्य कनिष्ठ अभियंता, पंचायत समिती अर्जुनी /मोर यांना दि.१३/१०/२०११ रोजी प्रथम अपील दाखल झाल्यानंतर माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत कळविले. त्यानंतर शाखा अभियंता श्री वैद्य यांनी अपीलार्थीस दि.१५/१०/२०११ रोजी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे आणि ती माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे अपीलार्थीने मान्य केले. मात्र सदर माहिती ही विलंबाने प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्ता यांच्या दि.०७/०३/२०११ च्या माहितीच्या अर्जात मागितलेली माहिती ही तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, श्री ए. एम. वैद्य यांच्या विभागाशी संबंधित होती. त्यांच्याकडे जनमाहिती अधिकारी यांनी दि.०८/०३/२०११ च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन देणेबाबत लेखी कळविले तरीदेखील श्री ए. एम. वैद्य यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडे ३० दिवसांचे मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यानंतर श्री वैद्य यांनी अपीलकर्त्यास दि.१५/१०/२०११ रोजी माहिती उपलब्ध करुन

दिलेली आहे. म्हणून सदरची माहिती विलंबाने उपलब्ध होण्यासाठी श्री ए. एम. वैद्य कनिष्ठ अभियंता हे जबाबदार दिसून येतात. म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ५ (५) अन्वये त्यांना जनमाहिती अधिकारी समजण्यात येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये रु.१०,०००/- ची शास्ती का करण्यात येवु नये याचा खुलासा त्यांच्याकडून मागविणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्त्याचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलार्थीने मागितलेल्या दि.०७/०३/२०११ च्या माहिती अर्जाप्रमाणे ३० दिवसांचे आत तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, पंचायत समिती अर्जुनी/मोर श्री ए.एम. वैद्य यांनी अपीलार्थीस कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यानंतर १५/१०/२०११ रोजी अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. म्हणून सदरच्या विलंबास श्री ए.एम. वैद्य हे जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये रु. १०,०००/- ची शास्ती का लादण्यात येवू नये याचा लेखी खुलासा त्यांना आयोगाचा हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत सादर करावा अन्यथा शास्ती कायम करण्यात येईल.

२.   सदरच्या निर्णयाची एक प्रत विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी श्री ए. एम. वैद्य कनिष्ठ अभियंता यांचेकडे खुलाशासाठी पाठवून त्याची पोच त्यांच्याकडून प्राप्त करावी.

३.   अपीलकर्ता व उत्तरवादी  यांना निर्णयाची  प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र.............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ  नागपूर  यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.१०३०/नाग/२०११**

१. श्री नानाजी जैदास रामटेके - **अपीलकर्ता**
रा. जानवा पो. इटखेडा
ता. अर्जुनी/मोर. जि. गोंदिया.

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार - **उत्तरवादी**
तहसिल कार्यालय अर्जुनी/मोर
ता. अर्जुनी/मोर. जि. गोंदिया.

३. जनमाहिती अधिकारी तथा तलाठी - **उत्तरवादी**
तलाठी कार्यालय खामखुरा
ता. अर्जुनी/मोर. जि. गोंदिया.

**(आदेश पारित दिनांक १७/१०/२०११)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. २५/०६/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२१/०९/२०११ रोजी नोटीस काढून दि.१७/१०/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि. २२/११/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी कार्यालय खामखुरा ता. अर्जुनी मोर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन ग्राम पंचायत कार्यालय जानवा येथील २०१० च्या पावसाळयामध्ये पावसामुळे घराची पडझळ नुकसान झाल्याने

आपल्या मार्फत सर्व नोंद करण्यात आली असून लाभ धारकांच्या सर्व नोंदीच्या छायांकित प्रती त्यांनी मागितल्या होत्या. परंतु त्यांना ३० दिवसांचे मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलानंतरही त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरीता विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा तलाठी खामखुरा श्री एम. एन. डोये हे उपस्थित होते तसेच तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा तलाठी श्री आर. एस. सोनवणे हे देखील हजर होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार अर्जुनी/मोर यांचे वतीने नायब तहसिलदार श्री एस.एन. पांडे हे हजर होते.

विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा तलाठी श्री डोये यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.२२/११/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला होता. त्यावेळी तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा तलाठी श्री आर. एस. सोनवणे हे कार्यरत होते. परंतू त्यांनी अपीलकर्त्यास ३० दिवसांत माहिती उपलब्ध करुन दिली नाही. त्यानंतर अपीलार्थीस दि.०५/१०/२०११ च्या पत्रान्वये विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा तलाठी श्री डोये यांनी अपीलकर्त्यास पोस्टाद्वारे माहिती उपलब्ध करुन दिल्याचे सांगितले. परंतु सदरची माहिती पोस्टाद्वारे प्राप्त झाली नाही असे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे. म्हणून दि.०५/१०/२०११ च्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिलेल्या माहितीची एक ज्यादा प्रत विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास आयोगासमोर उपलब्ध करुन दिली आणि ती प्रत अपीलार्थीने स्विकृत केली. परंतू सदरची माहिती ३० दिवसात उपलब्ध झाली नाही म्हणून झालेल्या विलंबाबद्यल तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा तलाठी यांचेवर कार्यवाही करावी अशी अपीलकर्त्याने आयोगापुढे मागणी केली.

४. प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार अर्जुनी/मोर यांचे वतीने हजर असलेले नायब तहसिलदार श्री पांडे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा प्रथम अपीलाचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला नाही म्हणून प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन निर्णय देण्यात आलेला नाही.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलार्थीच्या दि.२२/११/२०१० च्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा तलाठी श्री आर. एस. सोनवणे यांनी ३० दिवसात कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यानंतर विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि.०५/१०/२०११ च्या पत्राद्वारे माहिती पाठविल्याचे दिसून येते. तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा तलाठी श्री सोनवणे यांनी अपीलकर्त्यास ३० दिवसात माहिती का उपलब्ध करुन दिलेली नाही याबाबत त्यांना खुलासा विचारला असता त्यांनी सांगितले की, त्या काळात अतिवृष्टीच्या सर्व्हेचे काम करणे सुरु होते. तसेच अपीलार्थीचा माहितीचा अर्ज कोतवाल यांनी त्यांच्याकडे सादर केला नाही म्हणून अपीलकर्त्यास ३० दिवसात कोणतीही माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. असे तत्कालीन तलाठी श्री सोनवणे यांनी आयोगापुढे सांगितले. तथापी तत्कालीन तलाठी श्री सोनवणे यांनी विलंबाबद्यल केलेला खुलासा हा मान्य करण्यासारखा नाही कारण माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ७ (१) अन्वये ३० दिवसात माहिती उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे म्हणून अपीलार्थीस विलंबाने माहिती प्राप्त होण्यासाठी श्री सोनवणे हे जबाबदार दिसून येतात म्हणून त्यांच्याविरुध्द शास्तीची कार्यवाही करणे योग्य आहे त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा तलाठी श्री आर. एस. सोनवणे यांनी अपीलार्थीच्या दि.२२/११/२०१० च्या माहिती अर्जाला अनुसरुन ३० दिवसांचे मुदतीत अपीलार्थीस कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. म्हणून वर नमुद केल्याप्रमाणे अपीलकर्त्यास विलंबाने माहिती उपलब्ध होण्यास श्री सोनवणे हे जबाबदार दिसून येतात म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये रु. १०,०००/- ची शास्ती लादण्यात येत आहे.

३. सदरच्या शास्तीची रक्कम तहसिलदार अर्जुनी/मोर जिल्हा गोंदिया यांनी श्री सोनवणे यांचे दरमहाचे वेतनातून वसूल करुन ती लेखाशिर्ष "००७० - इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) " मध्ये जमा करावी.

४. सदरच्या शास्तीच्या वसूलीची कार्यवाही तहसिलदार अर्जुनी/मोर गोंदिया यांनी करावयाची आहे आणि सदर शास्तीची रक्कम संपूर्ण वसूल झाल्यानंतर त्याचा अहवाल न चुकता आयोगाकडे सादर करावा.

५. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र.............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.१०४३/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री मोहम्मद जफर वल्द अब्दुल सत्तार<br>रा. ९६/अ, गांधी ले-आऊट, जाफर नगर, नागपूर<br>ता. जि. नागपूर -४४० ०१३. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा जमाबंदी आयुक्त तथा संचालक<br>भुमि अभिलेख कार्यालय पूणे.<br>नवीन प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, विधान भवन समोर, पुणे-४११००१. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी उपसंचालक<br>भुमि अभिलेख कार्यालय, नागपूर प्रदेश नागपूर<br>जुने सचिवालय, सिव्हील लाईन्स नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १८/१०/२०११)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०४/०७/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२१/०९/२०११ रोजी नोटीस काढून दि.१८/१०/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. मात्र त्यांनी दि.१२/१०/२०११ च्या पत्रान्वये राज्य माहिती आयोगाकडे लेखी निवेदन दिलेले असून

त्या निवेदनात त्यांनी असे नमुद केले आहे की, त्यांना जनमाहिती अधिकारी भूमि अभिलेख यांचेकडून अदयाप पर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी तथा उपसंचालक, भूमी अभिलेख कार्यालय नागपूर श्री जे. एम. बेंडे हे हजर होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक भूमि अभिलेख श्री सुर्यवंशी हे उपस्थित होते. जनमाहिती अधिकारी श्री बेंडे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांचा दि.०४/०३/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. सदर माहितीच्या अर्जात अपीलार्थीने मौजा भानखेडा येथील नगर भुमापन क्रमांक १४०१ चे क्षेत्र दुरुस्ती संबंधी निकाली उत्तराच्या प्रतीसह पुराव्याच्या कागदपत्रांसह एक महिन्याचे आत जिल्हा अधिक्षक भुमि अभिलेख यांना आपल्या कार्यालयास दि.२४/०१/२०११ च्या पत्रान्वये कळविले होते. तेव्हा जिल्हा अधिक्षक, भूमि अभिलेख यांना आपल्या कार्यालयात अहवाल सादर केला आहे काय आणि अहवाल सादर केला असल्यास त्या अहवालाची सत्यप्रतीची मागणी त्यांनी केली होती. अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि.०१/०४/२०११ च्या पत्रान्वये जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख नागपूर यांना दि.१७/०३/२०११ व दि.०२/०४/२०११ अन्वये सदर प्रकरणात अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे अदयाप त्यांच्याकडून अहवाल प्राप्त झाला नाही त्यामुळे आपण मागणी केलेली माहिती तुर्त पुरविता येत नाही असे कळविले होते. सदर माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन दिल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. आणि सदरचे पत्र अपीलकर्त्यास पोस्टाद्वारे पाठविल्याबाबतचा पुरावा त्यांनी आयोगापुढे दाखविला. त्यानंतर अपीलार्थीने दि. २५/०४/२०११ रोजी प्रथम अपील जमाबंदी आयुक्त तथा संचालक पुणे यांचेकडे दाखल केले. तथापी प्रस्तुत प्रकरणात उपसंचालक नागपूर हे प्रथम अपीलीय अधिकारी असल्याने त्यांनी उपसंचालक नागपूर यांचेकडे सदरचे प्रथम अपील वर्ग केले. त्यानुसार उपसंचालक नागपूर यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दि.३०/०९/२०११ रोजी निर्गमित केला आणि त्या निर्णयात असे नमुद केले की, जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख नागपूर यांचेकडून आता प्रस्तुत प्रकरणात अहवाल प्राप्त झाला असल्यास त्या अहवालाच्या सत्यप्रतीची झेरॉक्स प्रत अपीलार्थीस द्यावी असे श्री सुर्यवंशी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले.

४. प्रस्तुत प्रकरणात जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की, दरम्यानच्या काळात जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख यांनी अहवाल सदर केलेला आहे. तसेच प्रथम अपीलाच्या निर्णयात देखील सदरचा अहवाल प्राप्त झाला असल्यास तो अपीलकर्त्यास पुरविणे बाबत निर्णय दिला होता. त्याला अनसुरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि.१३/१०/२०११ च्या पत्रान्वये जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख नागपूर यांचेकडून प्राप्त झालेल्या अहवालाची झेरॉक्स प्रत विनामुल्य अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिल्याचे त्यांनी सांगितले आणि दि.१३/१०/२०११ चे पत्र अपीलार्थीस पोस्टाद्वारे पाठविल्याबाबतचा पुरावा त्यांनी आयोगापुढे सादर केला.

५. जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याच्या दि.०४/०३/२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि.०१/०४/२०११ च्या पत्रान्वये व त्यानंतर दि.१३/१०/२०११ च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र.............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.१०५७/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री राजू विश्वनाथ भोयर<br>मु. पो. लाव्हा<br>ता. जि. नागपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार<br>तहसिल कार्यालय नागपूर (ग्रामीण)<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा ग्राम अधिकारी<br>तलाठी कार्यालय, फेटरी सा. क्र.४, नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १८/१०/२०११)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. ११/०७/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२२/०९/२०११ रोजी नोटीस काढून दि.१८/१०/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. तथापी जनमाहिती अधिकारी तथा तलाठी सज्जा क्र. ४ फेटरी नागपूर ग्रामीण श्री बी. एस.

हटवार हे हजर होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा मंडळ अधिकारी श्री घोडे हे हजर होते. आणि तहसिलदार ग्रामीण यांचे वतीने नायब तहसिलदार श्री जी. एम. खैरकर हे उपस्थित होते.

३. जनमाहिती अधिकारी तथा तलाठी फेटरी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि.१०/०५/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.१३/०५/२०११ रोजी प्राप्त झाला होता. सदरच्या माहितीच्या अर्जात अपीलार्थीने मौजा लाव्हा येथील शेतनंबर १७० मधील फेरफाराबाबत दि.१२/१०/२००९ आणि दि.२६/११/२००९ रोजी दोन आक्षेप अर्ज दाखल केले होते. त्या आक्षेप अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितली होती.

४. अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी तथा तलाठी यांनी अपीलकर्त्यास दि.०२/०६/२०११ पत्रान्वये आवश्क ती माहिती उपलब्ध करुन दिली आणि सदरचे पत्र अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याची पोच त्यांनी आयोगापुढे सादर केली. मात्र त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील मंडळ अधिकारी यांचेकडे दाखल केले. त्याला अनुसरुन मंडळ अधिकारी श्री घोडे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांच्याकडे दि.०८/०६/२०११ रोजी दाखल झाले होते. त्या अनुषंगाने अपीलार्थी त्यांच्या कार्यालयात हजर झ ाले त्यावेळी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांच्या फेरफाराचे आक्षेपाबाबत तलाठी यांनी दि.०२/०६/२०११ च्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिलेली माहिती बरोबर असल्याचे नमुद केले. आणि फेरफाराचे आक्षेपाबाबत उपविभागीय अधिकारी नागपूर यांचेकडे जमिन महसूल अधिनियम अंतर्गत अपील दाखल करण्याचे मार्गदर्शन केले. त्यानुसार अपीलार्थीने उपविभागीय अधिकारी नागपूर यांचेकडे अपील दाखल केले असून सदरच्या अपीलाचा अदयाप निर्णय झालेला नाही असे देखील मंडल अधिकारी आणि नायब तहसिलदार श्री खैरकर यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले.

५. प्रस्तुत प्रकरणात जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी आणि नायब तहसिलदार श्री खैरकर यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या

दि.१०/०५/२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन दि.०२/०६/२०११ च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र.............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.१०४४/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री अनिल भास्कर साठे<br>रा. कुकडे ले-आऊट, २४२ पो. भगवान नगर, नागपूर<br>ता. जि. नागपूर-२७. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)<br>जिल्हा परिषद नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १८/१०/२०११)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०४/०७/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२१/०९/२०११ रोजी नोटीस काढून दि.१८/१०/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, माध्यमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद नागपूर यांचे वतीने कक्ष अधिकारी श्री सिंग उपस्थित आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद नागपूर श्री आ. बा. पाटील हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.२८/०१/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक माध्यमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन बिशप कॉटन शाळा धरमपेठ या शैक्षणिक संस्थेतील मुख्याध्यापकाची शैक्षणिक पात्रता आणि जन्मतारीख, टिचिंग नॉन टिचिंग स्टाफची यादी आणि बायलॉज (नियमावली) अशी एकूण १ ते ३ मुद्यांवर माहिती मागितली होती. जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांना दि.२८/०२/२०११ च्या पत्राने वर्ग केला होता. त्यांना माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी देखील दि.०४/०७/२०११ च्या पत्रान्वये अपीलार्थीस असे कळविले की, संबंधित शाळेचे मुख्याध्यापक हे माहिती अधिकारी असल्यामुळे शाळेकडे रितसर अर्ज करावा आणि माहितीसाठी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांशी संपर्क करावा. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी द्वितीय अपील दाखल केले. तसेच आयोगाकडील द्वितीय अपीलाच्या सुनावणीचेवेळी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की, यापूर्वी देखील अपीलकर्त्याने बिशप कॉटन स्कुल या संस्थेविषयी माहिती मागितली होती. त्या संदर्भातील अयोगाकडील अपील क्र.८३२/२००९ त्यांनी दाखल केले होते. आणि त्याचा निर्णय आयोगाने दि.०७/११/२००९ रोजी दिला होता आणि आयोगाने सदरच्या शैक्षणिक संस्थेची माहिती उपलब्ध देण्याचे आदेश दिले होते. मा. आयोगाच्या या आदेशविरुध्द संबंधित शैक्षणिक संसथेने मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांचेकडे याचिका क्र.१०५२/२०१० दाखल केले होते. आणि त्या याचिकेची सुनावणी होवून दि.२६/०७/२०१० रोजी मा. उच्च न्यायालयाने निर्णय दिलेला असून त्या निर्णयामध्ये शिक्षणाधिकारी (मा) जिल्हा परिषद नागपूर यांनी सदरच्या शैक्षणिक संस्थेकडून माहिती प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले आहेत. मा. उच्च न्यायालयाच्या दि.२६/०७/२०१० च्या निर्णयाची प्रत अपीलकर्ता यांनी शिक्षणाधिकारी यांचेसमक्ष आयोगापुढे सादर केली. आणि या शैक्षणिक संस्थेबाबत शिक्षणाधिकारी यांनी पुन्हा त्यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे अपीलकर्ता यांनी सांगितले.

३. जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून शिक्षणाधिकारी श्री पाटील हे हजर होते. त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीने मागितलेली माहिती बिशप कॉटन हायस्कुल धरमपेठ यांचेशी संबंधित

असल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी सदरच्या शैक्षणिक संस्थेस अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत कळविले आहे. मात्र अपीलार्थीस सदर संस्थेने अदयाप माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही म्हणून शिक्षणाधिकारी यांनी मा. उच्च न्यायालयाच्या दि.२६/०७/२०१० च्या निर्णयाला अनुसरुन संबंधित शाळेकडून माहिती प्राप्त करुन घेऊन अपीलार्थीस उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्त्याचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद नागपूर यांनी मा. उच्च न्यायालयाच्या दि.२६/०७/२०१० च्या निर्णयाला अनुसरुन प्रस्तुत प्रकरणासंबंधि शाळेकडून माहिती प्राप्त करुन घेऊन अपीलार्थीस विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र.............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.१०५८/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री लिलाधर रामकृष्ण ठाकरे<br>मु. पो. कोलार पो. बुटीबोरी<br>ता. जि. नागपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत विभाग)<br>जिल्हा परिषद कार्यालय नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा खंडविकास अधिकारी<br>पंचायत समिती कार्यालय नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २०/१०/२०११)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०६/०७/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२२/०९/२०११ रोजी नोटीस काढून दि.२०/१०/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.१९/०३/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा खंडविकास अधिकारी, पंचायत समिती नागपूर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन श्रीमती बकाल सचिव, ग्रामपंचायत कोलार यांच्याविषयी दि.१७/०६/२०१० ला गावकऱ्यांनी तक्रार दिली होती त्या तक्रारीच्या

संदर्भात केलेल्या कार्यवाहीचीबाबत त्यांनी एकूण ६ मुद्यांवर माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दि.११/०४/२०११ च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध झाली. त्यामध्ये मुद्या क्र. १ बाबत दि.१७/०६/२००९ च्या तक्रार अर्जाची चौकशी सुरु आहे आणि मुद्या क्र.२ बाबत चौकशी अहवाल जोडण्यात येत आहे असे नमुद केले आहे. परंतू सदरच्या चौकशी अहवालाची प्रत त्यांना अदयापपर्यंत मिळालेली नाही असे अपीलार्थीचे म्हणणे आहे. त्यानंतर अपीलकर्ता यांनी दि.२६/०४/२०११ रोजी उपमुख्य कार्यपालन अधिकारी (पंचायत विभाग) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. परंतु त्यांचे प्रथम अपील निकाली काढल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे खंडविकास अधिकारी, पंचायत समिती नागपूर श्री कुहिटे हे हजर होते. आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नागपूर श्री रणदिवे हे उपस्थित होते. त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि.१९/०३/२०११ चा माहितीचा अर्ज जनमिहती अधिकारी यांचेकडे प्राप्त झाला होता. त्याला अनुसरुन अपीलार्थीस दि.११/०४/२०११ च्या पत्रान्वये १ ते ६ मुद्यांची माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. तसेच अपीलकर्ता यांच्या दि.१७/०६/२००९ ला दिलेल्या तक्रार अर्जाच्या चौकशीची कार्यवाही सुरु आहे आणि सदरच्या चौकशीची स्थिती ही प्रगती पथावर आहे सदर चौकशी पूर्ण झाल्यानंतर चौकशी अहवाल अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्यात येईल असे जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे मान्य केले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलार्थीच्या दि.१९/०३/२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन अपीलार्थीस दि.११/०४/२०११ च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी दि.१७/०६/२००९ च्या तक्रारीची चौकशी ३० दिवसात पूर्ण करण्यात येवून त्या चौकशी अहवालाची प्रत देखील अपीलार्थीस उपलब्ध करुन देण्याचे जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी मान्य केले म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# <u>आ दे श</u>

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आत अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांनी गावकऱ्यांनी दि.१७/०६/२००९ ला दिलेल्या तक्रार अर्जाची चौकशी पूर्ण करुन त्या चौकशी अहवालाची प्रत अपीलार्थीस व्यक्तीशः किंवा रजिस्टर्ड पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र.............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.१०६०/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री अशोक रायभान चिमनकर<br>प्लॉट नं.१७६, शिक्षक कॉलनी, भरत नगर, कळमना मार्केट रोड, नागपूर<br>ता. जि. नागपूर-३५. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षण संचालक<br>माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, पुणे<br>ता. जि. पुणे-१. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी<br>माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, पुणे<br>ता. जि. पुणे-१. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २०/१०/२०११)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०२/०७/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२२/०९/२०११ रोजी नोटीस काढून दि.२०/१०/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.२७/०१/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय पुणे यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांचेकडील दि.१२/११/२०१० च्या पत्रानुसार संबंधित

अधिकारी यांचेवर कोणती कार्यवाही केली त्याबाबतची त्यांनी माहिती मागितली होती. परंतु त्यांना कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय पुणे श्री साबळे हे उपस्थित होते. त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयातील आस्थापना शाखेचे जनमाहिती अधिकारी यांचेशी संबंधित असल्याने अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी (आस्थापना) यांनी दि.०४/०२/२०११ च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उलपब्ध करुन दिलेली आहे. त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील शिक्षण सहसंचालक यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि.०३/०६/२०११ रोजी घेण्यात आली आणि प्रथम अपीलाचा निर्णय दि.०४/०६/२०११ रोजी देण्यात आला. त्या निर्णयामध्ये जनमाहिती अधिकारी (आस्थापना) यांनी दि.०४/०२/२०११ च्या पत्रान्वये अपीलार्थीस आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्त्याचे प्रथम अपील खारीज करण्यात येत आहे असे नमुद केले आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. तथापी आस्थापना शाखेचे जनमाहिती अधिकारी यांचेकडून अपीलकर्त्यास दि.०४/०२/२०११ च्या पत्रान्वये पाठविलेली माहिती त्यांना अदयाप मिळालेली नाही असे अपीलार्थीचे म्हणणे आहे म्हणून जनमाहिती अधिकारी श्री साबळे यांनी आस्थापना शाखेचे जनमाहिती अधिकारी यांचेकडून अपीलार्थीस दि.०४/०२/२०११ च्या पत्रान्वये पाठविलेल्या माहितीची एक प्रत अपीलार्थीस पुन्हा रजिस्टर्ड पोस्टाने उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्त्याचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि.०४/०२/२०११ च्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिलेल्या माहितीची पुन्हा एक प्रत अपीलकर्त्यास विनामुल्य रजिस्टर्ड पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र.............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.१०६२/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री आर. डी. दहाट<br>ए/१३, व्यंकटेश नगर, के.डी.के. कॉलेज जवळ, नंदनवन, नागपूर<br>ता. जि. नागपूर-९. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा सह सचिव<br>शालेय शिक्षण विभाग,<br>मंत्रालय, मुंबई-३२. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी<br>शालेय शिक्षण विभाग,<br>मंत्रालय, मुंबई-३२. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २०/१०/२०११)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०८/०७/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२२/०९/२०११ रोजी नोटीस काढून दि.२०/१०/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.२४/०३/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी शालेय शिक्षण विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन पुढीलप्रमाणे दोन मुद्यांवर माहिती मागितलेली आहे.

१. ३८ शाळांपैकी ज्या १२ शाळांनी मी उपस्थित न झाल्याचे कळविले आहे. त्यांची नावे देवून माहिती द्यावी.

२. मा. कक्ष अधिकारी वित्त विभाग मंत्रालय यांचे पत्र क्र. संकीर्ण-१०११/सं.क्र.९७/ सेवा-४ दि.१२/०२/२०११ या पत्रानुसार केलेल्या कार्यवाहीची प्रमाणित प्रत देवून तात्काळ माहिती उपलब्ध करुन द्यावी.

अशा प्रकारची माहिती मागितलेली आहे. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दि.२१/०४/२०११ च्या पत्रान्वये माहितीचे शुल्क भरण्याबाबत कळविण्यात आले त्याला अनुसरुन त्यांनी माहितीचे शुल्क मनीऑर्डरद्वारे पाठविले. परंतु सदरची मानिऑर्डर मंत्रालयात स्विकृत न होता परत आली. मात्र त्यानंतर त्यांना ३ ऑक्टोबर २०११ च्या पत्रान्वये माहिती विलंबाने उपलब्ध झाल्याचे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

३. आज आयोगापुढे जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय मुंबई यांचे वतीने आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहसचिव शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय मुंबई या दोघांच्या वतीने शिक्षण उपसंचालक कार्यालयातील लेखाधिकारी श्री घुगे हे हजर आहेत.

जनमाहिती अधिकारी यांचे वतीने उपस्थित असलेले श्री घुगे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांचा दि.२४/०३/२०११ चा माहितीचा अर्ज जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यासनाकडे दि.०७/०४/२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलार्थीने मागितलेली माहिती काढण्यात आली आणि अपीलकर्त्यास दि.२१/०४/२०११ च्या पत्रान्वये माहितीचे शुल्क भरण्याबाबत कळविले. परंतू अपीलकर्ता यांनी माहितीचे शुल्क भरले नाही. म्हणून अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील उपसचिव यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि.२३/०६/२०११ रोजी ठेवण्यात आली होती. परंतु अपीलकर्ता त्या सुनावणीस उपस्थित झाले नाही त्यानंतर दि.०३/१०/२०११ च्या पत्रान्वये अपीलार्थीस आवश्यक ती माहिती पोस्टाद्वारे नि:शुल्क उपलब्ध करुन देण्यात आल्याचे श्री घुगे यांनी सांगितले. सदरची माहिती अपीलार्थीस प्राप्त झ ााल्याचे अपीलकर्त्याने आयोगापुढे मान्य केले. जनमाहिती अधिकारी यांनी दि.०३/१०/२०११ च्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती विनामुल्य उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र.............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.१०८४/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री विचित्र यशवंत भातनकर<br>मु. सालेबर्डी पो. सरांडी<br>ता. तिरोडा जि. गोंदिया. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी<br>जिल्हा परिषद गोंदिया<br>जि. गोंदिया. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी<br>प्राथमिक आरोग्य केंद्र, मुंडीकोटा<br>ता. तिरोडा जि. गोंदिया. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २४/१०/२०११)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. ११/०७/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०५/१०/२०११ रोजी नोटीस काढून दि.२४/१०/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.०१/०३/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र मुंडीकोटा ता. तिरोडा यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर

करुन मार्च २००५ ते फेब्रुवारी २०११ पर्यंतचे पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया केसेस बाबत आर-३ मध्ये नोंदीच्या झेरॉक्स प्रती मागितलेल्या आहेत. तथापी त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी दि.१८/०३/२०११ च्या पत्रान्वये असे कळविले की, त्यांच्या कार्यालयात सध्या अनुदान शिल्लक नसल्यामुळे अनुदानासाठी त्यांनी वरिष्ठ कार्यालयात मागणी केली आहे आणि अनुदान प्राप्त झाल्यानंतर आपणास माहिती उपलब्ध करुन देता येईल मात्र जर आपणास कागदपत्रांची (आर-३) शहानिशा करुन घ्यावयाची असेल तर आपण कार्यालयीन वेळेत येऊन या कागदपत्रांचे निरिक्षण करुन घ्यावे असे त्यांना कळविले मात्र याबाबत त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा गोंदिया यांचेकडे दाखल केले. मात्र त्यांचे प्रथम अपील फेटाळण्यात आल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय ओपल दाखल केले.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी प्राथमिक अरोग्य केंद्र मुंडीकोटा ता. जि. गोंदिया श्री निलेश बढे हे हजर होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा आराेग्य अधिकारी यांचे वतीनेही त्यानाच प्राधिकृत करण्यात आले होते.

जनमाहिती अधिकारी श्री बढे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि.०१/०३/२०११ चा माहितीचा त्यांच्या कार्यालयाकडे दि.११/०३/२०११ रोजी प्राप्त झाला होता. आणि अपीलार्थीस दि.१८/०३/२०११ च्या पत्रान्वये सध्या त्यांच्या कार्यालयात अनुदान शिल्लक नसल्यामुळे त्यांनी वरिष्ठ कार्यालयास अनुदानाची मागणी केली असून अनुदान प्राप्त होताच आपणास माहिती पुरविण्यात येईल जर आपणास आर-३ चे निरिक्षण करावयाचे असल्यास आपण कार्यालयात यावे व आपणास माहिती दाखविण्यात येईल असे कळविण्यात आले. सदरचे दि.१८/०३/२०११ चे पत्र प्राप्त झाल्याचे अपीलार्थीने आयोगापुढे मान्य केले. मात्र अपीलार्थीचे असे म्हणणे आहे की, त्यांनी मागितलेली माहिती ही स्वखर्चाने झेरॉक्स काढून प्राप्त करुन घेण्यास त्यांनी आयोगापुढे तयारी दर्शविली. आणि सदरची माहिती अपीलार्थीस निरिक्षणासाठी उपलब्ध करुन देऊन अपीलार्थीने स्वखर्चाने माहितीच्या झेरॉक्स काढल्यास जनमाहिती अधिकारी यांची कोणतीही हरकत नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

४. अपीलकर्ता आणि जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर अपीलकर्त्याने जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात कार्यालयीन कामकाजाचे दिवशी व कार्यालयीन वेळेत हजर राहून त्यांनी मागितलेल्या माहितीचे निरिक्षण करुन घेऊन त्यांनी मागितलेल्या माहितीच्या स्वखर्चाने झेरॉक्स करुन घेऊन माहिती प्राप्त करुन घेणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत अपीलकर्त्याने जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात कार्यालयीन कामकाजाचे दिवशी कार्यालयीन वेळेत हजर राहून संबंधित कागदपत्रांचे निरिक्षण करुन घ्यावे आणि निरिक्षण झाल्यानंतर त्यांना पाहिजे असेलेल्या माहितीच्या त्यांनी स्वखर्चाने झेरॉक्स प्रती प्राप्त करुन घ्याव्या.

२. अपीलकर्ता जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात कागदपत्रांचे निरिक्षण करण्यासाठी हजर झाल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी सदरची कागदपत्रे निरिक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावी. आणि निरिक्षण झाल्यानंतर त्यांना पहिजे असलेल्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती अपीलकर्त्याने स्वखर्चाने काढून प्राप्त करुन द्याव्या.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र.............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.१०८७/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री विरेन्द्र गजानन दहिकर<br>२३९, चॉक्स कॉलनी कामठी रोड, नागपूर<br>ता. जि. नागपूर-१४. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी<br>समाजकल्याण विभाग, महानगर पालिका, नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>समाजकल्याण विभाग, महानगर पालिका, नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २४/१०/२०११)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. १२/०७/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१०/१०/२०११ रोजी नोटीस काढून दि.२४/१०/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.१३/०२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी, नगर विकास मंत्रालय मुंबई यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन नगर विकास मंत्रालय महाराष्ट्र शासन मुंबई तर्फे सन २००५-०६ साली शहरी विभागात सुवर्ण जयंती रोजगार योजने अंतर्गत दारिद्रय रेषेखाली ज्या

कुटुंबाची गणना करण्यास्तव ज्या एजंसी/कंत्राटदारा द्वारे कुटुंबाचे सर्वेक्षण करण्यात आले त्यांचे नाव व त्यांना देण्यात आलेले वर्क ऑर्डर (कार्यारंभ आदेश) ची प्रत पुरविणे. तसेच त्या सर्वेक्षणामध्ये खाली दिलेल्या १ ते ५ कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले काय? जर आला असेल तर त्यांच्या ज्या शासकीय कुटुंब गणना पत्रकाद्वारे सर्वेक्षण करण्यात आले त्या कुटुंब गणना पत्रकाची सत्यप्रत पुरविणे बाबतची माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दारिद्रय रेषेखाली कुंटुबांची गणना केल्याची यादी व वर्क ऑर्डरची प्रत मिळाली मात्र त्यांनी नावे दिलेल्या १ ते ५ कुंटुंबाच्या गणनापत्रकाची प्रत मिळाली नाही म्हणून त्यांनी दि.१२/०४/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलानंतर देखील त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे जनमाहिती अधिकारी तथा समजाकल्याण विभाग म.न.पा. नागपूर श्रीमती सुलभा करडे हजर होत्या. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी, समजाकल्याण विभाग, महानगरपालिका नागपूर श्रीमती सुधा हिरसकर उपस्थित होत्या.

जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांचा माहितीचा अर्ज नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडे पाठविण्यात आला आणि सदर अर्ज हा दि.१९/०४/२०१० रोजी त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला. त्याला अनुसरुन त्यांनी दि.२४/०४/२०१० च्या पत्राद्वारे अपीलार्थीस माहितीचे शुल्क रु. १४/- भरण्याबाबत कळविले. सदरचे पत्र अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की, ते दारिद्रय रेषेखालील असल्यामुळे त्यांना विनामुलय माहिती मिळणे आवश्यक आहे. तथापी अपीलार्थीने माहितीच्या शुल्काचा भरणा केला नाही त्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि.१३/१०/२०११ ला विनामुल्य माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र त्यांनी माहितीच्या अर्जात नमुद केलेल्या ५ कुटुंबाच्या कुटुंब गणनेची प्रत त्यांना प्राप्त झाली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. त्यावर जनमाहिती यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीने मागितलेल्या ५ कुटुंबापैकी ४ कुटुंबाच्या गणनेची प्रत उपलब्ध आहे ती उपलब्ध करुन देण्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र श्री गजानन दहिकर रा. चॉक्स कॉलनी यांच्या कुटुंब गणनेची प्रत त्यांच्याकडे मिळाली

झाली नाही म्हणून त्याबाबत पुन्हा एकदा कसून शोध घेऊन त्याची प्रत देखील अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन देण्याचे त्यांनी मान्य केले. तथापी श्री गजानन दहिकर यांचे कुटुंब गणनेच्या पत्रकाच्या प्रत चा शोध घेऊनही उपलब्ध न झाल्यास तसे स्पष्टपणे अपीलार्थीस कळविणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत अपीलकर्त्याच्या माहिती अर्जातील १ ते ५ कुटुंबाच्या कुटुंब गणनेच्या पत्रकाची प्रत विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. तथापी गजानन दहीकर यांच्या कुटुंब गणनेच्या पत्रकाचा पुन्हा शोध घ्यावा आणि ती प्राप्त झाल्यास ते विनामुल्य अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावी. मात्र त्यांचे कुटुंबगणना पत्रक जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपलब्ध नसल्यास तसे त्यांना स्पष्ट विनामुल्य पोस्टाद्वारे कळवावे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र.............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.१०९६/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री रविन्द्र मारोती गडेकर<br>मु. पो. अडयाळ<br>ता. पवनी जि. भंडारा-४४१ ९०३. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस अधिक्षक<br>भंडारा<br>ता. जि. भंडारा. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी<br>साकोली.<br>ता. साकोली जि. भंडारा. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २५/१०/२०११)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०९/०७/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१०/१०/२०११ रोजी नोटीस काढून दि.२५/१०/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.१२/०३/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, साकोली यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन अपीलकर्त्याने

दि.०३/०३/२०११ रोजी पोलीस स्टेशनमध्ये दिलेल्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दि.२५/०३/२०११ रोजी कळविले की, आपण माहितीच्या अधिकाराखाली मागणी केलेली माहिती तयार आहे म्हणून सदरच्या माहितीचे शुल्क रु.२६/- भरण्याबाबत त्यांना कळविण्यात आले. मात्र अपीलकर्ता हे दारिद्रय रेषेखालील असल्यामुळे त्यांना विनामुल्य माहिती मिळणे आवश्यक होते. म्हणून अपीलकर्ता यांनी पोलीस अधिक्षक भंडारा यांचेकडे दि.१३/०४/२०११ ला प्रथम अपील दाखल केले. त्यानंतर त्यांना दि.१३/०४/२०११ च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध झाली मात्र सदरच्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी साकोली श्री अभिनव देशमुख हे हजर होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस अधिक्षक भंडारा यांचे वतीने श्री बी. एस. महाजन पोलीस उप अधिक्षक (गृह) भंडारा हे उपस्थित होते.

जनमाहिती डॉ. अभिनव देशमुख यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.१२/०३/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलार्थीने मागितलेली माहिती संबंधित पोलीस स्टेशनकडुन संकलीत करण्यात आली आणि अपीलार्थीस दि.२५/०३/२०११ च्या पत्रान्वये असे कळविले की, आपण माहितीच्या अर्जात मागितलेली माहिती आमचेकडे तयार आहे त्यासाठी माहितीचे शुल्क रु.२६/- भरणा करावे असे अपीलकर्त्यास कळविले. परंतू अपीलकर्ता हे दारिद्रय रेषेखालील असल्याचे त्यांच्या लक्षात आल्यानंतर अपीलार्थीस दि.१८/०४/२०११ च्या पत्रान्वये विनामुल्य माहिती उपलब्ध करुन दिल्याचे श्री देशमुख यांनी सांगितले. परंतू अपीलकर्ता यांनी पोलीस अधिक्षक भंडारा यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२०/१०/२०११ रोजी देण्यात आला त्यामध्ये असे नमुद केले की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि.१८/०४/२०११ च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे प्रथम अपील खारीज करण्यात आले असल्याचे श्री महाजन यांनी सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी यांचेकडून दि.१८/०४/२०११ च्या पत्रान्वये पाठविलेली माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाली. मात्र त्यांनी दि.०३/०३/२०११ रोजी पोलीस स्टेशन लाखनी येथे दिलेल्या अर्जाच्या संदर्भात कोणतीही मौका चौकशी केलेली नाही त्यामुळे या संदर्भात केलेली कार्यवाही योग्य नाही असे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याच्या तक्रार अर्जावर कार्यकारी दंडाधिकारी लाखनी यांचेकडे इस्तेगासा तयार करुन पाठविलेला आहे. आणि सदरची कार्यवाही ही नियमाला अनुसरुन केलेली आहे असे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रस्तुत प्रकरणी म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी दि.१८/०४/२०११ च्या पत्रान्वये अपीलार्थीस आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र.............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.१०९५/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री रविन्द्र मारोती गडेकर<br>मु. पो. अडयाळ<br>ता. पवनी जि. भंडारा-४४१ ९०३. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता<br>सार्वजनिक बांधक विभाग, भंडारा<br>ता. जि. भंडारा. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता<br>सार्वजनिक बांधक उपविभाग पवनी<br>ता. पवनी, जि. भंडारा. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २५/१०/२०११)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०९/०७/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१०/१०/२०११ रोजी नोटीस काढून दि.२५/१०/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.१९/०३/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग पवनी यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन पुढीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

१. अडयाळ लाखनी रोडचे नविनीकरण आणि सुलुचभराई बद्यलच्या कामाचे अंदाजपत्रके मागितली होती. तसेच वापरण्यात येणारा कच्चा माल, साधने आणि यंत्रसामुग्री बद्यल माहिती देण्यात यावी.

२. अडयाळ लाखनी रोडचे काम सुरु आहे परंतु अदयापपर्यंत माहिती फलक का लावण्यात आलेला नाही याबद्यल माहिती देण्यात यावी.

३. सदर दोनही कामे कोणती संस्था करीत आहे.

४. रोडचे नविनीकरण करण्यात येत आहे. तेथील नमुने माझ्या समक्ष तपासण्यात यावे.

अशी एकूण ४ मुद्यांवर त्यांनी माहिती संबंधात मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी दि.२८/०३/२०११ च्या पत्रान्वये असे कळविले की, आपण मागणी केलेली माहिती आपणास नेमकी कोणती माहिती हवी आहे याचा अर्थबोध होत नाही करीता आपण या कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपस्थित रहावे जेणेकरुन आपणास नेमकी हवी असलेली माहिती पुरविता येणे शक्य होईल सदरच्या पत्रात जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस नेमकी तारीख कळविलेली नाही. म्हणून ते त्यांच्या कार्यालयात उपस्थित झाले नाही त्यानंतर त्यांनी दि. ०२/०५/२०११ रोजी कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग भंडारा यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर देखील त्यांना अपूर्ण माहिती मिळाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग पवनी श्री आर. एल. पेंदोर हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग भंडारा यांच्या वतीने श्रीमती वि. रा. सावरकर उप कार्यकारी अभियंता ह्या उपस्थित होत्या.

जनमाहिती अधिकारी श्री पेंदोर यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि. १९/०३/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.२८/०३/२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचा निश्चित बोध होत नव्हता म्हणून त्यांनी अपीलकर्त्यास दि.२८/०३/२०११ च्या पत्रान्वये कळविले की, आपण मागणी केलेल्या माहितीमध्ये नेमकी आपणास कोणती माहिती हवी आहे याचा अर्थबोध होत नाही म्हणून आपण या कार्यालयात कार्यालीन वेळेत उपस्थित रहावे म्हणजे आपणास नेमकी हवी असलेली माहिती पुरविता

येणे शक्य होईल मात्र अपीलकर्ता त्यांचे कार्यालयात हजर झाले नाही. तथापी अपीलकर्त्यास दि.२४/०५/२०११ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली. त्यानंतर अपीलकर्त्याने कार्यकारी अभियंता यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली आणि प्रथम अपीलाची सुनावणी झाल्यानंतर दि.२५/०५/२०११ रोजी प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला आणि त्यामध्ये असे नमुद केले की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास १ ते ४ मुद्यांपैकी मुद्या क्र. २ ची माहिती वगळून इतर माहिती दिलेली आहे आणि मुद्या क्र.२ ची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्यात यावी असे नमुद करुन अपील निकाली काढण्यात आले असे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने हजर असलेले श्रीमती सावरकर यांनी आयोगापुढे सांगितले की. अपीलकर्त्याच्या माहिती अर्जातील मुद्या क्र.२ मध्ये अडयाळ लाखनी रोडचे काम सुरु आहे परंतू अजुनपर्यंत माहिती फलक का लावण्यात आलेला नाही त्याबाबत अपीलार्थीने माहिती मागितलेली आहे त्यावर जनमाहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, सदरचा फलक तयार केलेला आहे परंतू रोडच्या साईडपट्टयांचे काम पूर्ण झाल्यानंतर फलक लावलेला असल्याचे त्यांनी आयोगापुढे सांगितले. म्हणून ही वस्तुस्थिती जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस कळविणे संयुक्तिक होईल त्यासाठी अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून सात दिवसांचे आत अपीलकर्त्यास त्यांच्या माहिती अर्जातील मुद्या क्र.२ ची माहिती विनामुल्य रजिस्टर्ड पोस्टाने किंवा व्यक्तीशः उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र.............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.१०९७/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री धनंजय महादेवराव अपराजित<br>जागनाथ बुधवारी, कैलास टॉकीज जवळ, नागपूर<br>ता. जि. नागपूर-२. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा संचालक (पणन कक्ष)<br>गृह निर्माण व क्षेत्र विकास मंडळ, (म्हाडा) मुंबई<br>गृह निर्माण भवन, कक्ष क्र.७६, कला नगर, वांद्रे (पूर्व) मुंबई-५१. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा संचालक (पणन कक्ष)<br>गृह निर्माण व क्षेत्र विकास मंडळ, (म्हाडा) मुंबई<br>गृह निर्माण भवन, कक्ष क्र.७६, कला नगर, वांद्रे (पूर्व) मुंबई-५१. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २५/१०/२०११)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. ११/०७/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१०/१०/२०११ रोजी नोटीस काढून दि.२५/१०/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे आणि त्या माहितीबाबत त्यांचे समाधान झाले असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास हरकत नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात यत आहे.

## आ दे श

१.	अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२.	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र.............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.१०९४/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री केवळराम रामदास शेंडे<br>मु. उमरी (सावरटोला) पो. चान्ना (कोडका)<br>ता. अर्जुनी /मोर जि. गोंदिया-४४१७०२. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार<br>तहसिल कार्यालय अर्जुनी /मोर<br>ता. अर्जुनी /मोर जि. गोंदिया. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा संचालक (पणन कक्ष)<br>तहसिल कार्यालय अर्जुनी /मोर<br>ता. अर्जुनी /मोर जि. गोंदिया. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २५/१०/२०११)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०८/०७/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१०/१०/२०११ रोजी नोटीस काढून दि.२५/१०/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२.  अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.१४/०२/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी, तहसिल कार्यालय अर्जुनी /मोर जि. गोंदिया यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन अपीलार्थीने दि.२०/१२/२०१० रोजी जिल्हाधिकारी गोंदिया आणि तहसिलदार अर्जुनी /मोर यांचेकडे तक्रार अर्ज दिला होता. त्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली सदरची माहिती अपीलकर्ता यांना प्राप्त झाल्यामुळे त्यांनी समाधान व्यक्त केले म्हणून अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१.  अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२.  अपीलकर्ता व उत्तरवादी  यांना निर्णयाची  प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र.............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ  नागपूर  यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.१०९३/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री मोरेश्वर सुदामजी उपरे, सहा. शिक्षक<br>जिल्हा परिषद हायस्कुल, नवेगाव मोरे<br>ता. पोंभुर्णा जि. चंद्रपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)<br>जिल्हा परिषद चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक<br>जनता विद्यालय पोंभुर्णा<br>ता. पोंभुर्णा जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २५/१०/२०११)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. १३/०७/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१०/१०/२०११ रोजी नोटीस काढून दि.२५/१०/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जनता विद्यालय, पोंभुर्णा जि. चंद्रपूर यांच्या तर्फे श्री अभय पाचपोर हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) जिल्हा परिषद चंद्रपूर श्री आर. पी. देशपांडे हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.२२/०२/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जनता विद्यालय पोंभुर्णा ता. पोंभुर्णा जि. चंद्रपूर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन

दि.१०/०८/१९९३ ते एप्रिल १९९६ पर्यंत अपीलकर्ता यांनी या कार्यालयात सहाय्यक शिक्षक पदावर काम केले होते. त्यांच्या हजेरीपटावरील स्वाक्षऱ्या व वेतन देयकाची त्यांनी माहिती मागितली होती. परंतु त्यांना दि.२१/०३/२०११ च्या पत्रान्वये जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी कळविले की, आपण मागितलेली माहिती अन्य वर्षापूर्वीची असल्यामुळे माहिती शोधण्याचे काम सुरु आहे माहिती प्राप्त होताच ती आपणास पुरविण्यात येईल. मात्र त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दि.२९/०३/२०११ रोजी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली आणि जनमाहिती अधिकारी यांना माहिती शोधण्यासाठी २० दिवसांची मुदत दिली आणि २० दिवसांचे आत माहिती शोधून अपीलकर्त्यास माहिती द्यावी असा प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला. मात्र त्यानंतरही त्यांना माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचे वतीने उपस्थित असलेले ॲड. अभय पाचपोर यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि.२२/०२/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलार्थीने मागितलेली माहिती ही १८ वर्षापूर्वीची असल्यामुळे त्या माहितीचा शोध घेण्यात आला म्हणून अपीलार्थीस दि.२१/०३/२०११ च्या पत्रान्वये आपण मागितलेली माहिती ही १८ वर्षापूर्वीची असल्यामुळे सदर माहितीचा शोध सुरु आहे आणि माहिती प्राप्त होताच आपणास पुरविता येईल असे जनमाहिती अधिकारी यांनी कळविले आहे तसेच अपीलार्थीने मागितलेल्या माहितीचा पुन्हा कसून शोध घेण्यात आला तसेच प्रथम अपीलाच्या निर्णयात नमुद केल्याप्रमाणे देखील पुन्हा जनमाहिती अधिकारी यांनी सदर माहितीचा शोध घेतला परंतु अपीलार्थीने मागितलेली माहिती १८ वर्ष जुनी असल्यामुळे ती प्राप्त होवू शकली नाही असे ॲड. पाचपोर यांनी सांगितले. ॲड पाचपोर यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की, माध्यमिक शाळा संहितेच्या परिशिष्ट १५ मधील अनु क्र.१९ नुसार हजेरीपटाचा जतन करण्याचा कालावधी हा १० वर्षाचा असतो त्यामुळे अपीलार्थीने मागितलेल्या हजरेपटाच्या प्रती ह्या १८ वर्षापूर्वीच्या असल्यामुळे त्या कार्यालयात उपलब्ध झाल्या नाहीत म्हणून अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी दि.०४/०६/२०११ च्या पत्रान्वये कळविले की, माध्यमिक शाळा संहितेच्या परिशिष्ट १५ मधील अनु क्र.१९ नुसार हजेरीपटाचा जतन करण्याचा कालावधी हा १० वर्षाचे वर ठेवता येत नाही त्यामुळे आपण मागणी केलेले दस्तऐवज १८ वर्षापूर्वीचे असल्यामुळे ते दस्तऐवज नष्ट करण्यात आले असावे असे दिसते.

मागणी केलेले दस्तऐवज नष्ट झाले असल्याने ते दस्तऐवज देऊ शकत नाही असे स्पष्टपणे अपीलार्थीस कळविण्यात आले असल्याचे ॲड पाचपोर यांनी सांगितले.

४. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद चंद्रपूर श्री देशपांडे यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी प्रथम अपीलाच्या निर्णयात असे नमुद केले आहे की, माहिती ही १८ वर्षापूर्वीची असल्याने माहिती अधिकाऱ्यांनी माहितीचा शोध घेवून २० दिवसांचे आत अर्जदारास माहिती उपलब्ध करुन द्यावी. तथापी मुख्याध्यापकांनी पुन्हा माहितीचा शोध घेतला परंतू माहिती उपलब्ध झाली नाही. तसेच हजेरीपटाचा जतन करण्याचा कालावधी हा १० वर्षाचा असतो.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे वकील आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रस्तुत प्रकरणी म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, माध्यमिक शाळा संहितेनुसार हजेरीपट जतन करण्याचा कालावधी हा १० वर्षाचा असतो तथापी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही १८ वर्षापूर्वीची असल्यामुळे ती उपलब्ध झालेली नाही आणि तसे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि.०४/०६/२०११ च्या पत्रान्वये कळविलेले आहे म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र.............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**